
www.rajdand.com
सातारा, शुक्रवार
05.01.2024
पृष्ठ : ४ । मुल्य : ४ । मार्गशीर्ष कृ.२२
rajdandlive
Reg.No.MAHMAR/17902/1999

मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
स्थापना १९९९

## तूरडाळ झाली स्वस्त



(पान ३ वर)

## बार्टीने निर्णय फिरवला १० जानेवारीला सीईटी होणार!

**पुणे** : पीएच. डी. अधिछात्रवृत्तीसाठी १० जानेवारीची परीक्षा रद्द करण्याचा निर्णय डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेने (बाटी) जाहीर केला होता. मात्र हा निर्णय बार्टीने फिरवला आहे. नव्या निर्णयानुसार आता सीईटी होणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.राज्य शासनाच्या बाटी, सारथी, महाज्योती या संस्थांच्या माध्यमातून पीएच.डी.धारक विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या पाठ्यवृत्तीसाठी काही दिवसांपूवी परीक्षा घेण्यात आली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सेट विभागाकडून घेण्यात आलेल्या परीक्षेत २०१९च्या सेट परीक्षेची प्रश्नपत्रिका देण्यात आल्याचा प्रकार समोर आला. त्यावर आक्षेप घेऊन परीक्षा रद्द करण्याची मागणी करण्यात आली. त्यानंतर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात झालेल्या बैठकीत आधीची परीक्षा रद्द करून १० जानेवारीला फेरपरीक्षा घेण्याचा निर्णय घेण्यात आला. या पाश्वर्भूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधक अधिछात्रवृत्तीसाठी १० जानेवारीला होणारी परीक्षा रद्द करण्यात आल्याचे परिपत्रक बार्टीचे महासंचालक सुनील वारे यांनी संकेतस्थळावर प्रसिद्ध केले. त्यानंतर बार्टीने परीक्षा रद्द करण्याबाबत घेतलेल्या निर्णयाच्या धतीवर सारथीने परीक्षा रद्द करण्याच्या मागणीसाठी उपोषण सुरू करण्यात आले.

# राज्यात जुन्या पेन्शनचा पर्याय

### मंत्रिमंडळाचा महत्त्वपूर्ण निर्णय; २६ हजार शासकीय कर्मचाऱ्यांना लाभ

**मुंबई : राज्य शासनाच्या सेवेत १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त झालेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना जुन्या निवृत्तिवेतन योजनेचा पर्याय देण्याचा अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय राज्य मंत्रिमंडळाने गुरुवारी घेतला. अर्थात कोणती योजना स्वीकारायची याचा निर्णय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घ्यायचा आहे. मात्र जुनी निवृत्ती योजना लागू करण्याच्या मागणीची पूतर्ता करण्याच्या दिशेने सरकारने टाकलेले हे सकारात्मक पाऊल असल्याचे सांगत राज्य कमर्चारी व अधिकारी संघटनांनी निणर्याचे स्वागत केले आहे.**



१ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त झालेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना नवीन राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना लागू करण्यात आली. मात्र निवृत्तीनंतर नेमके निवृत्तिवेतन किती मिळेल, याबाबत शास्वती नाही. त्यामुळे ही योजना रद्द करून सर्व कर्मचाऱ्यांयांना सरसकट जुनी योजना लागू करावी, या मागणीसाठी कमर्चारी व शिक्षक संघटनांनी यंदा दोन वेळा संप पुकारला. त्याची दखल घेऊन राज्य सरकारने नव्या व जुन्या निवृत्तिवेतन योजनेचा अभ्यास करुन शासनाला शिफारस करण्यासाठी तीन माजी सनदी अधिकाऱ्यांची समिती स्थापन केली होती. समितीने नोव्हेंबरमध्ये अहवाल शासनाला सादर केला. सरकारने दिलेल्या आश्वासनाप्रमाणे पहिल्या टप्प्यात नोकरभरती प्रक्रियेतून १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर निवड झालेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना जुन्या निवृत्तीवेतन योजनेचा पर्याय देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याचे राज्य सरकारी कमर्चारी मध्यवती संघटनेचे सरचिटणीस विश्वास काटकर, महाराष्ट्र राज्य राजपित्रत अधिकारी महासंघाचे नेते ग.दि. कुलथे, अध्यक्ष विनोद देसाई, सरचिटणीस समीर भाटकर यांनी स्वागत केले आहे. या निणर्याचा सुमारे २६ हजार शासकीय अधिकारी, कमर्चारी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना लाभ मिळणार आहे, अशी माहिती काटकर यांनी दिली.

जुन्या निवृत्ती वेतन योजनेचा पर्याय देण्यात आलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना सवर्साधारण भविष्य निर्वाह निधी आणि अनुषंगिक नियमाच्या तरतुदी लागू करण्यात येणार आहेत.

संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शासन निर्णय प्रसिद्ध झाल्यानंतर ६ महिन्यांच्या कालावधीत निवड करणे बंधनकारक राहील. जे जुनी निवृत्तीवेतन योजना लागू करण्याचा पर्याय देणार नाहीत, त्यांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील. जुनी योजना स्वीकारणाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधीचे खाते उघडण्यात येईल व त्या खात्यात नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन खात्यातील, त्यांच्या हिश्श्याची रक्कम व्याजासह जमा करण्यात येईल.

# लातूरला आठवड्यातून एकदा पाणीपुरवठा
## अकराशे गावांवर सावट

**लातूर** : लातूरमधील पाणीटंचाईची परिस्थिती भीषण रूप धारण करत आहे. जानेवारीतच लातूर शहराला आठवडयातून एकदा पाणीपुरवठा केला जात असून, जिल्ह्यातील १०९७ गावे आणि २५२ वाडयावस्त्याही टंचाईच्या सावटाखाली आहेत. मांजरा धरणामध्ये केवळ २० टक्के जिवंत पाणीसाठा आहे. दहा वर्षांपूवी लातूरला रेल्वेने पाणी आणावे लागले होते. त्याची चर्चा देशभर झाली होती. आता पुन्हा आलेला टंचाईचा फेरा रुळांवरच्या मार्गाने नेतो की काय, अशी चिंता भेडसावत आहे.

लातूर शहरवासीयांना गतवर्षीच्या मार्च ते ऑक्टोबर २०२३ पर्यंत आठवडयातून दोनदा पाणीपुरवठा केला जात होता. मात्र, यावषी पाऊस कमी झाल्यामुळे व लातूर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मांजरा धरणात जलसाठा कमी असल्याने पाणी कपात करण्यात आली आहे. शहरवासीयांनी पाणी जपून वापरण्याचे आवाहन पाणीपुरवठा विभागाचे कायर्कारी अभियंता विजयकुमार चव्हाण यांनी केले आहे.

लातूर शहरवासीयांना आठवडयातून चार दिवस पाणी वितरण केले जाते व दोन दिवस टाक्यांमध्ये पाणी भरून घेण्यासाठीचा वेळ दिला जातो. आठवडयातून एक वेळ पाणी नळावाटे दिले जाते. लातूर शहरात मनपाच्या १०६० विंधन विहिरी असून, त्यातील ९५० विंधन विहिरी सुरू आहेत. काही भागात या विंधन विहिरी मार्फतही पाणी वितरण केले जाते. शहरवासीयांकडे खासगी विंधन विहिरीचे प्रमाण अतिशय मोठे आहे. किमान ५० हजार पेक्षा जास्त खासगी विंधन विहिरी असण्याचा अंदाज आहे. त्यामुळे नळाच्या पाण्यावर फारसे विसंबून कोणी राहत नाही. पिण्याच्या पाण्यासाठी नळाच्या पाण्याचा वापर केला जातो. पाण्याचे जार विकत घेण्याचे प्रमाणही वाढले आहे. यावषी पाऊस सरासरीपेक्षा कमी झाल्यामुळे जानेवारी ते जून या सहा महिन्यांच्या काळात जिल्ह्यात पाणीटंचाईची भीती असून, जिल्हा प्रशासनाने टंचाई निवारणासाठी ३९ कोटी ४८ लाख ६३ हजार रुपयांचा आराखडा तयार केला आहे. डिसेंबरपासून जिल्ह्यातील बारा गावे आणि तीन वाडयाला पाणीटंचाईच्या झळा सहन कराव्या लागणार आहेत. लातूर तालुक्यातील चार, औसा दोन, अहमदपूर तीन गावे आणि तीन वाडया, शिरूर, अनंतपाळ व जळकोट तालुक्यातील प्रत्येक एका गावात पाणीटंचाई जाणवत आहे. या गावाने अधिग्रहणासाठी पंचायत समितीकडे प्रस्ताव पाठवलेले आहेत.

यावर्षी जानेवारी ते मार्च या कालावधीत जिल्ह्यातील १०९७ गावे आणि २५२ वाडयांना पाणीटंचाईची धास्ती आहे. टंचाई निवारण्यासाठी १९ कोटी ६३ लाख २० हजार रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला असून, एक एप्रिल ते ३० जून या कालावधीसाठी १९ कोटी ८५ लाख ४३ हजारांचा आराखडा तयार करण्यात आला आहे.

यावर्षीच्या उपाययोजनांमध्ये १४६ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जाईल. ५५८ विहीर व विंधन विहिरींचे अधिग्रहण केले जाईल. २८१ विंधन विहीर नव्याने घेतल्या जातील. ४७ नळ योजनांची दुरुस्ती हाती घेतली जाणार असून, ३६ विहिरींचा गाळ काढण्याची योजना आहे. १०९७ गावांना संभाव्य टंचाईची भीती व्यक्त केली जात आहे.

# पालिका रुग्णालयात शून्य औषध चिठ्ठी योजनेसाठी एक हजार कोटींची तरतूद!

**मुंबई** : मुंबई महापालिकेच्या सर्व प्रमुख रुग्णालयांमध्ये ह्यशून्य औषध चिठ्ठी योजना (झिरो प्रिस्क्रिप्शन) राबविण्याचा निर्णय पालिका प्रशासनाने घेतल्यामुळे रुग्णांना कोणतेही औषध बाहेरून विकत घ्यावे लागणार नाही. यासाठी लागणाऱ्या वाढीव औषध खरेदीचा आढावा घेऊन एक हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. याबाबतच्या प्रस्तावाला महापालिका आयुक्त इक्बालसिंह चहेल यांनी मान्यता दिली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अलीकडेच मुंबई महापालिकेच्या आरोग्य व्यवस्थेचा आढावा घेतल्यानंतर महापालिकेच्या रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना बाहेरून औषध खरेदी करावे लागू नये यासाठी झिरो प्रिस्क्रिप्शन योजना राबविण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार अतिरिक्त आयुक्त (आरोग्य) यांनी संबंधित अधिष्ठाते व अधिकाऱ्यांची बैठक घेऊन प्रमुख रुग्णालयांमध्ये केल्या जाणाऱ्या औषध खरेदीचा आढावा घेतला. तसेच रुग्णांना बाहेरून कोणती औषधे आणावी लागतात याची माहिती घेतली. पालिकेच्या सर्व प्रमुख रुग्णालयांसाठी वर्षाकाठी सुमारे ६०० कोटी रुपयांची औषध खरेदी केली जाते.

निविदा प्रक्रिया व पुरवठादारांकडून होणारा पुरवठा तसेच अन्य काही कारणांमुळे अनेकदा उपचार करणारे डॉक्टर रुग्णांच्या नातेवईकांना बाहेरून औषध आणण्यास सांगतात. यापुढे रुग्णांना कोणत्याही परिस्थितीत रुग्णालयाच्या



बाहेरून औषध खरेदी करावी लागू नये यासाठी अतिरिक्त आयुक्तांनी एक हजार कोटींच्या जादा औषध खरेदीचा प्रस्ताव तयार करून आयुक्त इक्बालसिंह चहेल यांच्याकडे गेल्या आठवड्यात सादर केला. आयुक्तांनी त्याला मान्यता दिली असून लवकरच एक हजार कोटी रुपयांची अतिरिक्त औषध खरेदी केली जाईल, असे पालिका सूत्रांनी सांगितले. या योजनेची अंमलबजावणी येत्या १५ जानेवारीपासून करण्यात येणार आहे.

मुंबई : मुंबई महापालिकेच्या सर्व प्रमुख रुग्णालयांमध्ये ह्यशून्य औषध चिठ्ठी योजना (झिरो प्रिस्क्रिप्शन) राबविण्याचा निर्णय पालिका प्रशासनाने घेतल्यामुळे रुग्णांना कोणतेही औषध बाहेरून विकत घ्यावे लागणार नाही. यासाठी लागणाऱ्या वाढीव औषध खरेदीचा आढावा घेऊन एक हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. याबाबतच्या प्रस्तावाला महापालिका आयुक्त इक्बालसिंह चहेल यांनी मान्यता दिली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अलीकडेच मुंबई महापालिकेच्या आरोग्य व्यवस्थेचा आढावा घेतल्यानंतर महापालिकेच्या रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना बाहेरून औषध खरेदी करावे लागू नये यासाठी झिरो प्रिस्क्रिप्शन योजना राबविण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार अतिरिक्त आयुक्त (आरोग्य) यांनी संबंधित अधिष्ठाते व अधिकाऱ्यांची बैठक घेऊन प्रमुख रुग्णालयांमध्ये केल्या जाणाऱ्या औषध खरेदीचा आढावा घेतला. तसेच रुग्णांना बाहेरून कोणती औषधे आणावी लागतात याची माहिती घेतली. पालिकेच्या सर्व प्रमुख रुग्णालयांसाठी वर्षाकाठी सुमारे ६०० कोटी रुपयांची औषध खरेदी केली जाते.

निविदा प्रक्रिया व पुरवठादारांकडून होणारा पुरवठा तसेच अन्य काही कारणांमुळे अनेकदा उपचार करणारे डॉक्टर रुग्णांच्या नातेवईकांना बाहेरून औषध आणण्यास सांगतात. यापुढे रुग्णांना कोणत्याही परिस्थितीत रुग्णालयाच्या बाहेरून औषध खरेदी करावी लागू नये यासाठी अतिरिक्त आयुक्तांनी एक हजार कोटींच्या जादा औषध खरेदीचा प्रस्ताव तयार करून आयुक्त इक्बालसिंह चहेल यांच्याकडे गेल्या आठवड्यात सादर केला. आयुक्तांनी त्याला मान्यता दिली असून लवकरच एक हजार कोटी रुपयांची अतिरिक्त औषध खरेदी केली जाईल, असे पालिका सूत्रांनी सांगितले. या योजनेची अंमलबजावणी येत्या १५ जानेवारीपासून करण्यात येणार आहे.

# राज्याचे साखर उत्पादन ९५ लाख टनांवर जाणार

**पुणे** : राज्यात ऑक्टोबर, नोव्हेंबर महिन्यात बिगरमोसमी पावसाने चांगली हजेरी लावल्यामुळे उसाची उत्पादकता व साखर उताऱ्यामध्ये दहा ते बारा टक्के वाढ होण्याचा अंदाज आहे. हंगामपूर्व अंदाज ८८ लाख टनांचा होता, आता ९५ लाख टनांवर साखर उत्पादन जाण्याचा अंदाज आहे, अशी माहिती वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशनचे (विस्मा) अध्यक्ष बी. बी. ठोंबरे यांनी व्यक्त केले आहे.

ठोंबरे म्हणाले, की हंगामाच्या सुरुवातीस राज्याचा गळीत हंगाम अंदाजे ९० ते १०० दिवसांचा अपेक्षित होता. मात्र प्रत्यक्षात डिसेंबरअखेर एकूण ९४६ लाख टन ऊस उपलब्धतेत पाच टक्के वाढ होऊन उसाची उपलब्धता ९९३ लाख टनांवर गेली आहे. डिसेंबरअखेर ४२८ लाख टन उसाचे गाळप झाले असून, ६० दिवसांत ३८.२० लाख टन साखरनिमिती झाली आहे. अद्याप ५६५ लाख टन गाळप बाकी आहे.

बिगरमोसमी पावसामुळे प्रतिहेक्टरी उसाच्या उत्पादनात आठ ते दहा टक्के वाढ झाल्याने एकूण उपलब्ध उसामध्ये पाच



टक्के वाढ झाल्याने एकूण गाळपाचे दिवस १०० वरून १२५ ते १३० दिवस अपेक्षित आहेत. त्यामुळे डिसेंबरअखेर फक्त ४० टक्के ऊस गाळपातून ३८ लाख टन साखर उत्पादन झाले असल्याने उर्वरित ६० टक्के ऊस गाळपातून एकूण ९५ लाख टन साखर उत्पादनाचा अंदाज आहे.

बिगरमोसमी पावसामुळे प्रति हेक्टर ऊस उत्पादनात झालेली वाढ हे साखर उत्पादनात वाढ होण्याचे प्रमुख कारण आहे. त्यासह केंद्र सरकारने ७ डिसेंबर २०२३च्या आदेशान्वये उसाच्या रसापासून इथेनॉल उत्पादनास घातलेली बंदी व त्यामुळे इथेनॉलकडे वळवण्यात आलेल्या साखरेच्या वापरात मोठी घट हे दुसरे कारण आहे. हंगामाच्या सुरुवातीस महाराष्ट्रात ८८ लाख टन निव्वळ साखर उत्पादनाचा अंदाज विस्मा, साखर आयुक्तालय व साखर संघाने व्यक्त केला होता. अंदाजे आठ ते दहा लाख टन साखर इथेनॉलकडे वळवली जाणे अपेक्षित होते. मात्र वरील परिस्थितीमुळे आता चालू हंगामात निव्वळ साखरेचे उत्पादन ९५ लाख टन होण्याचा अंदाज विस्मा व साखर संघ यांच्या संयुक्त अभ्यासातून वर्तविण्यात येत असल्याचे ठोंबरे यांनी सांगितले.

देशांतर्गत वापरासाठी एकूण २८० लाख टन साखर लागते. प्रत्यक्ष या वर्षीचे अपेक्षित साखर उत्पादन ३२० लाख टन इतके आहे. देशांतर्गत वापरासाठी मुबलक साखर उपलब्ध असेल. साखरेचा तुटवडा निर्माण होऊन भाववाढ होण्याची भीती निराधार आहे. त्यामुळे इथेनॉल निमितीला केंद्राने परवानगी देऊन दिलासा द्यावा, अशी मागणी विस्माचे अध्यक्ष बी. बी. ठोंबरे यांनी केली आहे.

# शिवडी-न्हावाशेवा लिंक रोडवरील प्रवासासाठी २५० रुपयांचा टोल

**मुंबई** : सुमारे २१ हजार २०० कोटी रुपये खर्चाच्या आणि २२ किलोमीटर लांबीच्या बहुचर्चित शिवडी-न्हावाशेवा अटल सेतूवरून प्रवासासाठी वाहनांना तब्बल २५० रुपये पथकर (टोल) भरावा लागणार आहे. यासंदर्भात आज (४ जानेवारी) गुरुवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय घेण्यात आला. तसंच, अन्य महामार्गाच्या तुलनेत हा दर कमी असल्याचा दावा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने केला आहे.

मुंबईतून कोकण किंवा पश्चिम महाराष्ट्रात सुखकारक प्रवासासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने या पुलाची उभारणी केली असून या प्रकल्पाची किंमत आता २१ हजार २०० कोटींवर गेली



आहे. प्रकल्पाचे काम पूर्ण झाले असून लवकरच हा सागरी सेतू वाहतुकीसाठी खुला होणार आहे. प्रकल्पावर झालेला खर्च वसूल करण्यासाठी सुमारे ३० वर्षांसाठी पथकर आकारण्याचा निर्णय प्राधिकरणाने घेतला असून त्यासाठी नवी मुंबईतील उलवेजवळ शिवाजीनगर आणि चिर्ले (गव्हाण) या दोन ठिकाणी पथकर नाके उभारण्यात येणार आहेत. या मार्गावरील पथकराचा दर मुंबई-नागपूर समृद्धी महामार्ग, मुंबई -पुणे द्रुतगती महामार्ग आणि वांद्रे-वरळी सागरी सेतूवरील पथकरांपेक्षा कमी असल्याचा दावा प्राधिकरणाने केला आहे.

मुंबई झ्र नवी मुंबई प्रवास सुकर आणि वेगवान करण्यासाठी एमएमआरडीएकडून २१.८० किमी लांबीच्या शिवडी झ्र न्हावाशेवा सागरी सेतूची उभारणी करण्यात येत आहे. या प्रकल्पाच्या कामाला २०१८ मध्ये सुरुवात करण्यात आली होती. हे काम सप्टेंबर २०२२ मध्ये पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र करोना आणि इतर अडचणींमुळे या कालावधीत प्रकल्प पूर्ण होऊ शकला नाही.

मंत्रिमंडळातील इतर महत्त्वाचे निर्णय

नोव्हेंबर २००५ पूर्वीच्या जाहिरातीनुसार नोव्हेंबर २००५ नंतर रुजू झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना जुन्या निवृत्ती वेतन योजनेचा पर्याय.

दूध उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा. दुधासाठी ५ रुपये प्रति लिटर अनुदान.

विदर्भातील सिंचन अनुशेष दूर करण्यासाठी वैनगंगा-नळगंगा प्रकल्पास पाणी उपलब्धतेची अट शिथिल करणार

मंत्रालयीन लिपिक टंकलेखकांना दरमहा पाच हजार रुपये ठोक भत्ता.

पॉवरलूमला प्रोत्साहन देण्यासाठी इचलकरंजी पॉवरलूम मेगा क्लस्टरला भांडवली अनुदान. ४०० उद्योगांना फायदा होणार.

रेशीम उद्योगाच्या विकासासाठी सिल्क समग्र २ योजना राबविणार. रेशीम शेतकऱ्यांना मोठा लाभ होणार

द्राक्ष उत्पादकांच्या हिताची वाईन उद्योगास प्रोत्साहन योजना सात वर्षांसाठी राबविणार

नांदेड झ्र बिदर नवीन ब्रॉडगेज प्रकल्पाला वेग देणार. ७५० कोटीस मान्यता सहकारी संस्थांच्या अधिकाऱ्यांविरुद्ध अविश्वास प्रस्तावासाठी कालावधी वाढवला

# नापास झाल्यामुळे पळालेली मुले मुंबई विमानतळावर सापडली

**मुंबई** : परीक्षेत नापास झाल्यामुळे इयत्ता नववीतील विद्यार्थ्यांनी आसाम येथील आपल्या घरातून पलायन केले. आर्टिफिशिअल इंटेलिजन्सद्वारे (एआय) व्यवसाय करून भरपूर पैसा कमवण्यासाठी दोघेही मुंबईत आले होते. कुटुंबियांना कोणतीही माहिती न देता त्यांनी मुंबईला जाणाऱ्या विमानाची तिकीटे काढली होती. याबाबत समजताच आसाम पोलिसांनी मुंबई पोलिसांना याची माहिती दिली. त्यानुसार सहार पोलिसांनी मुंबई विमानतळावर शोध घेतला असता दोन्ही मुले सापडली. त्यांना लवकरच कुटुंबियांच्या स्वाधीन करण्यात येणार आहे.

आसाममधील १४ आणि १५ वर्षांची दोन मुले बेपत्ता झाल्याची तक्रार कुटुंबियांनी दुमदुमा पोलीस ठाण्यात केली होती. त्यावेळी तपासणीत मुंबईला जाणाऱ्या विमानात मुले बसल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर आसाम पोलिसांनी तात्काळ याबाबतची माहिती मुंबई पोलिसांना दिली. सहार पोलीस, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल, सीमाशुल्क दल यांच्या अधिकाऱ्यांनी विमानतळावर शोध मोहीम राबवली. बुधवारी मध्यरात्री १ च्या सुमारास आलेल्या विमानातून दोन्ही मुले मुंबई विमानतळावर उतरली. दोन्ही मुलांना सहार पोलीस ठाण्यात आणण्यात आले असून याबाबतची माहिती आसाम पोलिसांना देण्यात आली आहे. तसेच मुलांच्या कुटुंबियांनाही याबाबतची माहिती दिली असून तेथून ते मुंबईला येण्यासाठी निघाले आहेत. त्याच्यासोबत आसाम पोलीस अधिकारीही आहेत. ते मुंबईत आल्यावर मुलांना त्यांच्या ताब्यात देण्यात येणार आहे.

चौकशीत दोन्ही मुले इयत्ता नववीच्या घटक चाचणी परीक्षेत नापास झाली होती. त्यामुळे आता पुढे शाळा सोडून व्यवसाय करण्याचा त्यांनी निर्णय घेतला. त्याबाबत ऑनलाईन सर्च केले असता ह्यएआयच्या मदतीने व्यवसाय करून भरपूर पैसा कमवता येऊ शकतात, असे त्यांना समजले. पण याबाबत कुटुंबियांना सांगितले, तर ते परवानगी देणार नाहीत. म्हणून दोघांनीही कुटुंबियांना न सांगताच मुंबईला जाण्यासाठी विमानाची तिकीटे काढली. कुटुंबियांना कोणतीही कल्पना न देताच ते मुंबईला रवाना झाले. पण मुलांनी केलेल्या आर्थिक व्यवहारांवरून त्यांनी विमानाचे तिकीट घेतल्याचे लक्षात आले. अधिक माहिती घेतली असता त्यांनी खासगी विमान कंपनीच्या ह्य१६ बी व १६ सी ही तिकीटे खरेदी केल्याचे लक्षात आले. मुंबईला येणाऱ्या विमानात मुले असल्याचे समजताच आसाम पोलिसांनी मुंबई पोलिसांना याबाबत माहिती दिली.

# कौल कुणाला द्यायचा?

यात्रा व भारतीयांचे नाते तसे अतूटच. अनादिकाळापासून चालत आलेले. याकडे कधी कुतूहलाने तर कधी भक्तिभावाने बघणे अथवा त्यात सामील होणे हेही अनेकांच्या अंगात भिनलेले. मग ती पदयात्रा असो वा वातानुकूलित वाहनातून केलेली रथयात्रा. अलीकडे या यात्रांचे वेगाने होत असलेले राजकीयीकरण हा चिंतेचा विषय आहे असे अजिबात समजण्याचे काही कारण नाही. धार्मिक आणि राजकीय मुद्दयांची बेमालूम सरमिसळ केली जाण्याच्या या काळात असे होणारच. जोवर या यात्रांना सामोरे जाणारा वर्ग देशात मोठया प्रमाणात उपलब्ध आहे तोवर तरी या यात्रांना मरण नाही. त्यातून कुणाला किती लाभ होतो व कुणाला तोटा याचे गणित वेगळे. त्यावर जास्त डोके खाजवण्याची गरज नाही. मात्र, राजकीय नेत्यांची प्रतिमा उजळण्यात, त्यांच्याभोवती एक आगळेवेगळे वलय निर्माण करण्यात या यात्रांचा वाटा मोठा राहिला आहे, हे निर्विवाद सत्य. त्यामुळे केंद्र असो अथवा राज्य, प्रत्येक ठिकाणच्या नेतृत्वाला अशी एक तरी यात्रा आपण काढावी असे तीव्रतेने वाटू लागले आहे. परिणामी देशात अलीकडे या यात्रांचा सुळसुळाट झालेला दिसतो.

तो योग्य की अयोग्य या वादात पडण्याचीही गरज नाही. या निमित्ताने नेत्याला थेट लोकांमध्ये मिसळता येते, त्यांच्याशी त्यांच्या क्षेत्रात जाऊन संवाद साधता येतो, अपेक्षित असलेली वातावरण निमिती करता येते. यात्रामार्गाच्या भागातील बाजारपेठही फुलते. हे फायदेही काही कमी महत्त्वाचे नाहीत. पूवी राजकीय नेते देशभर जाहीर सभा घ्यायचे. त्याला तेव्हा ह्यदौरेह्ण असे म्हणण्याची प्रथा होती. आता अशा सलग सभा-दौऱ्यांना यात्रा असे म्हणण्याची पद्धत रूढ झाली. हे दौरे हवाई असले तरी त्याला यात्राच म्हणावे असा हट्ट नेते धरताना दिसतात. याचे एकमेव कारण यात्रा या शब्दाला असलेल्या वलयात दडले आहे. काही शतकापूवी लोक यात्रेला- म्हणजे तीर्थाटनालाच- निघाले की अप्रूप म्हणून सारे गाव गोळा व्हायचे. सुखरूप परत या अशी कामना करायचे. ब्रिटिश लेखक जेफ्री चॉसर यांनी चौदाव्या शतकात लिहिलेल्या कँटरबरी टेल्स या पुस्तकात या यात्रांचे यथार्थ चित्रण आढळते. भारतात त्याच्याही आधी हा यात्रेचा भक्तिमार्ग चोखाळला गेला. अजूनही जात-पात, धर्म, पंथ असा भेद विसरायला लावणारी ह्यवारीह्ण हे त्याचेच सुधारित रूप. देशात स्वातंत्र्याची चळवळ सुरू झाली व या यात्रांचे स्वरूप बदलले. त्या संघर्षाच्या मार्गाचे प्रतीक म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या. याचे श्रेय निर्विवादपणे महात्मा गांधींना. उण्यापुऱ्या शंभर जणांच्या सहभागातून त्यांनी काढलेली दांडी यात्रा आजही आठवली जाते ती त्यामुळेच. स्वातंत्र्यानंतर देशात काँग्रेस सत्तेवर आली. तिचा एकछत्री अंमल सुरू झाला. तो जसजसा एकाधिकारशाहीकडे झुकू लागला तसेतसे विरोधक एकवटू लागले. त्यातून जन्म झाला तो संपूर्ण क्रांती व नवनिर्माण आंदोलनाचा. त्याची व्याप्ती वाढवण्यासाठी जयप्रकाश नारायण आदींनी आधार घेतला तो यात्रेचाच. त्याचे स्वरूप एवढे भव्य व व्यापक होते की सत्ताधाऱ्यांनी त्याची धास्ती घेऊन देशात आणीबाणीच घोषित केली.

अर्धशतकापूवी लोकप्रिय झालेल्या त्या यात्रांचा दृष्टिकोन राजकीय जरूर होता, पण निवडणुकीपुरता नव्हता. विद्यमान सत्ताधीशांना पराभूत करा, पण आमच्याच हाती सत्ता द्या असा आग्रह त्यात ठळकपणे तरी दिसत नव्हता. नंतर विरोधक सत्तेवर आले. त्यांना ती सत्ता नीट सांभाळता आली नाही. त्यातून त्यांच्या ऐक्याची शकले झाली. यातून उदयाला आलेल्या भाजपने नंतरच्या काळात या यात्रांना शुद्ध राजकीय रूप दिले. त्यासाठी आधार घेतला तो धार्मिक मुद्दयाचा. राम मंदिरासाठी निघालेली रथयात्रा हे त्यातले सर्वोच्च उदाहरण. याने लालकृष्ण अडवाणींना नाव व कीती मिळवून दिलीच, पण ही यात्रा रोखण्याचे धाडस कायद्यानुसारच दाखवणारे लालूप्रसाद यादवसुद्धा लोकांच्या स्मरणात राहिले. यात्रा हे राजकीय यशाचे हुकमी साधन आहे हा समज जनमानसात रुजवण्यात भाजपचा वाटा मोठा राहिला आहे.

आज राहुल गांधी नेमक्या त्याच वाटेने निघाले आहेत. या दोहोतला फरक हाच की काँग्रेसने हे यात्रा प्रकरण यशस्वी करण्यासाठी धर्माचा आधार घेतला नाही. राहुल गांधींच्या पहिल्या भारत जोडो यात्रेत त्यांच्या पायी चालण्याचे फार कौतुक झाले. याच नावाचा आधार घेत प्रसिद्ध समाजसेवक बाबा आमटेंनी काही दशकांपूवी देशात शांतता नांदावी म्हणून भारत जोडो यात्रा काढली होती. त्यात सामील झालेले हजारो तरुण दहशतवाद संपावा म्हणून देशभर फिरले. शांतीचा संदेश देणारी ही यात्रा राजकीय नव्हती. काँग्रेसची आधीची व आत्ताची भारत न्याय यात्रा राजकीय हेतूने प्रेरित नाही असा दावा या पक्षाकडून केला जात असला तरी त्यात फारसे तथ्य नाही. पहिल्या यात्रेनंतर काही राज्यांत झालेल्या निवडणुकांमध्ये काँग्रेसला मिळालेल्या यश व अपयशाची तुलना ह्यभारत जोडोह्णशी केली गेलीच. सत्तेचा होणारा गैरवापर, नियामक संस्थांमध्ये होत असलेला हस्तक्षेप, लोकशाहीचे वेगाने होत चाललेले खच्चीकरण, हुकूमशाही पद्धतीकडे होणारी वाटचाल, धार्मिक विद्वेषाचा पेटलेला वणवा, संघराज्य प्रणालीला निर्माण झालेला धोका, एकपक्षीय व एक व्यक्तिकेंद्रित झालेले राजकरण यासारख्या असंख्य मुद्दयांकडे काँग्रेसची यात्रा लक्ष वेधत असली तरी त्याचे अंतिम ध्येय हे सत्ताप्राप्तीचे आहे हे कुणीही अमान्य करणार नाही.

सत्ता मिळवण्यासाठी यात्रा हे लोकशाहीतले एक प्रमुख आयुध ठरले आहेच पण याच यात्रांचा आधार घेत देशात सत्तेवर आलेला भाजपसुद्धा आता सत्ता टिकवण्यासाठी याच अस्त्राचा वापर करताना दिसतो. सध्या सुरू असलेली केंद्राची संकल्प यात्रा हे त्याचे प्रतीक. अर्थात या यात्रेत सत्तेची सारी सूत्रे हाताळणारे मोदी व शहांसारखे नेते नाहीत, पण केंद्र आणि राज्य सरकारांची प्रशासकीय यंत्रणा भाजपच्या ध्वजाचे रंग असलेल्या या यात्रेसाठी राबते आहे. अनेक मंत्र्यांना त्याच्या यशस्वितेसाठी कामाला जुंपले गेले आहे. या यात्रांचे लोण आता राज्याराज्यातही पसरले आहेच. अडचणी वाढवणारे जनमत सर्वेक्षण बाहेर आल्याबरोबर देवेंद्र फडणवीसांनी जनादेश यात्रेची केलेली घोषणा हेच दर्शवते. एकेकाळी याच महाराष्ट्रात गोपीनाथ मुंडे यांच्या संघर्ष यात्रेने भाजपला पहिल्यांदा यश मिळवून दिले होते. कापसाच्या प्रश्नावर शरद पवारांनी काढलेली यात्रा त्यांच्या राजकीय यशात भर टाकणारी ठरली होती. जनतेला भेडसावणाऱ्या प्रश्नांची सोडवणूक व्हावी यासाठी आपण किती कष्ट करत आहोत हे दाखवण्यासाठी विरोधक त्यांच्या यात्रेत पायी चालण्याचा पर्याय स्वीकारतात तर सत्ताधारी वातानुकूलित रथातून यात्रा काढून, आम्ही सारे प्रश्न सोडवले असे सांगतात. दोन्हीकडल्या यात्रा केवळ प्रचाराच्या उद्देशानेच पुढे रेटल्या जात असल्या तरीही त्याला यात्रा हे नाव जाणीवपूर्वक दिले जाते. पूर्वी सरकारला जाब विचारण्यासाठी आंदोलने हे प्रभावी अस्त्र होते. आता त्याची जागा यात्रांनी घेतलेली आहे. सनदशीर मार्गाने सुरू असलेला हा यात्रांचा प्रवास जनतेला जास्त भावतो, या निष्कर्षांवर सारेच पक्ष आलेले दिसतात. त्यामुळे भक्तिमार्गापासून राजकीय मार्गाकडे वेगाने होत असलेला हा यात्रांचा प्रवास निखळ लोकशाहीचे प्रतीक म्हणून अनुभवायला काही हरकत नाही. यात्रांची ही यातायात २०२४ मध्ये वाढणारच आहे. ती कुतूहलाने जरूर पाहावी, पण कौल कुणाला द्यायचा हे ठरवण्याचा अधिकार अद्याप तरी प्रत्येकाला आहेच!

भक्तिमार्गावरून यात्रा स्वातंत्र्यलढयाकडे आल्या, मग राजकीय संघर्षांकडे आणि आता सत्ताधारी आणि विरोधी असे दोन्ही पक्ष थेट मतांच्या राजकारणासाठीच यात्रेकरू होत आहेत..

**भागा वरखडे**

# घरात एखादी मुलगी असती तर ...

गृहिणी असलेली वसुंधरा सहज बोलून गेली कि घरात एखादी मुलगी असती तर ... अन अचानक दुसऱ्या दिवशी घरात एक मुलगी येते .


कोण असते ती मुलगी? वसुंधरेच्या कल्पनेतली मुलगी कि कावेरीच्या शाप? काय शाप दिला होता कावेरीने ? आणि का?

वंशाला दिवा हवा या अट्टाहासापोटी कावेरीच्या मुलीला जन्मताच मारण्यात आले. त्यामुळे कावेरीला वेड लागले. वेडाच्या भरात कावेरीने शाप दिला या घरात मुलगी जन्माला येणार नाही. वास्तू तथास्तु म्हणाली.रात्री अकरा पावणे अकराचा सुमार होता . जहागीरदारांच्या घरात अनिरुद्ध सोडून सगळेच जागे होते . कौस्तुभचे अजून लिखाणकाम सुरु होते. रोज रात्री तास दोन तास लिहीत बसायचा. कौस्तुभ व्यवसायाने सॉफ्टवेअर इंजिनियर असून सुद्धा शब्दांच्या दुनियेत जास्त रमायचा . जयदेवचे संगणकावर काम सुरु होते . वसुंधरा स्वयंपाकघर आवरत होती तर सुमतीबाई माजघरात अंथरूण घालत होत्या. वसू एक कप कॉफी कर ना आत्ता? वसू अकरा तर वाजलेत, कर ना जयदेव, रात्रीचे अकरा वाजलेत. सकाळचे नाहीत.मला झोप आलीय आई मला पण एक कप कौस्तुभ, तू कॉफी करायला शिकून घे म्हणजे तुझे तू करून घेशील पण त्याला तुझ्यासारखी चव येणार नाही, त्यापेक्षा तूच कर ना ₹सगळे मीच करते. तुम्ही कुणी साधी कपबशी उचलत नाही . घरात दोन दोन वंशाचे दिवे आहेत पण एकही कामाचा नाही . त्यापेक्षा घरात एखादी मुलगी असती तर कामाला आली असती. या मुलांचा काही उपयोग नाही.

तुझे खरे आहे वसू घरात एखादी मुलगी हवीच. मुलींमुळे घरात घरपण येते. आपल्या शेजारी देसायांच्या घरी बघा , देसायांच्या मुली किती हुशार आहेत ते त्या देसायांच्या काट्र्या नुसत्या उच्छाद मांडतात अगदी. वेळ नाही . काळ नाही . नुसता गोंधळ . अजूनही गोंधळ सुरु आहे त्यांचा. पाचजणी आहेत पण एकपेक्षा एक दंगेखोर आहेत नुसत्या . त्या देसायांना काही कळत नाही मुलींना कसे वळण लावावे ते सुमतीबाई मध्येच बोलतात. तुम्ही कायम देसायांच्या मुलींना नावे का ठेवता हो? सकाळ संध्याकाळ तेच. तरी बरे आपल्या घरात कुणी मुलगी नाही , असती तर काय केले असते देव जाणे ₹वसु कॉफीचा काप घेऊन कौस्तुभच्या खोलीत जाते . कौस्तुभ, काय हे किती पसारा? सगळे आवरायचे मग झोपायचे. आई, मी नवी कथा लिहतोय त्याची सुरवात जमत नव्हती म्हणून एवढा पसारा झाला.ते नेहमीचे आहे. कोणत्या विषयवर लिहतोय आहे स्त्रीभूण हत्या विषय चांगला आहे. मला नंतर वाचायला दे.

जयदेव जहागीरदार चा बारा पंधरा खोल्यांचा मोठा दुमजली वाडा होता . शिवाय मागे एक विहीर होती . एक तुळशी वृंदावन होते . जयदेवच्या अनेक पिढ्या याच वाड्यात राहत होत्या. काळानुसार वाड्याच्या रचनेत थोडेफार बदल झाले . कौस्तुभ कथा लिहायला घेतो . तरीसुद्धा आपल्या घरात एखादी मुलगी असावी. या एका वाक्याने घरात मोठे वादळ येईल याची कुणाला कल्पना नव्हती. मुसळधार पावसाळा सुरुवात झाली होती . गेले दोन दिवस नुसता धो धो पाऊस पडत होता. वाड्याबाहेर जाणेसुद्धा मुश्किल झाले होते. मध्यरात्रीच्या सुमारास एक वाड्याच्या गुप्त दरवाजा उघडून एक माणूस आत आला. तिथे त्याची वाट बघत रावसाहेब उभे होते. त्यांनी विचारले काम झाले का? हो झाले हे घे तुझा मोबदला असे म्हणून रावसाहेबांनी त्याला पैशाची थैली दिली. तो माणूस गुप्त दरवाजाने निघून गेला. रावसाहेब माडीवर निघून गेले. त्यांना या घरात मुलगी नकोच होती . एवढ्या मोठ्या घराण्याला वारस हवा होता. मुलगा हवा होता . आज त्यांनी वंशाच्या दिव्यासाठी एका पणतीला विझवून टाकले होते . ही खूप मोठ्या संकटाची चाहूल होती.

दुसऱ्या दिवशीची सकाळ होती . मस्त पावसाळी वातावरण होते. वसूची रोजची कामे सुरु होती. एवढ्यात देसायांची धाकटी कन्या रमा येते. आल्या आल्या ती ₹वसु काकू अशी जोरात हाक मारते. त्या आवाजाने सुमतीबाई दचकतात . तिला कौस्तुभची गाडी हवी होती फिरण्यासाठी. ती गाडी घेऊन जाते. त्यानंतर सुमतीबाई विचारतात काय ग कशाला आली होती ती? तिला कौस्तुभची गाडी हवी होती फिरायला जायचे होते मैत्रिणीबरोबर दिली का गाडी मग? हो दिली कशाला द्यायची? ती रमा गावभर फिरत असते माहिती आहे



का ? फिरत असेल त्यात काय? मुलींच्या जातीला हे शोभत नाही, देसायांनी काही वळण लावले नाही मुलींना आता अनिरुद्ध कौस्तुभला मैत्रिणी आहेत ते बरे चालते तुम्हाला. मला तुमचे हे विचारच पटत नाहीत.

रात्री कौस्तुभ पुन्हा लिखाण करायला बसतो . दोन दिवसापासून परशुराम बेपत्ता होता . घर सोडून निघून गेला होता . रावसाहेबांनी त्याला शोधायला माणसे पाठवली होती . गावात सगळीकडे शोधला पण कोणालाच तो सापडला नाही . वाड्यावर सगळेजण काळजीत होते . शतप्रवाही नदीला पूर आला होता . त्यामुळे गावाबाहेर जाण्याचे सगळे मार्ग बंद झाले होते. मागे दोनदा परशुराम असाच घर सोडून गेला होता . त्यावेळी तो नदीकाठच्या देवळात सापडला होता . आता देऊळच पाण्याखाली होते . माजघरात कावेरीच्या मावशीने आत्याबाईना हळूच विचारले, कावेरी शुद्धीवर आली वाटते, मी बघून येऊ का? काही गरज नाही त्याची. कावेरीची काय घेऊन बसलं तुम्ही , परशुचा अजून पत्ता नाही दोन दिवस झाले कावेरीने काही खाल्ले नाही, मी तिला मऊ तूप भात घेऊन जाते.

आम्हीसुद्धा दोन दिवस जेवलो नाही आम्हाला काही झाले नाही.₹पण कावेरीची प्रकृती अजून नाजूक आहे तशी .. शिवाय तुम्ही तिची मुलगी सुद्धा ..

त्या काटीचे नाव सुद्धा काढू नका. अपशकुनी मेली . तिच्यामुळे आमच्यावर आज ही वेळ आली आहे.

पण तुम्हीसुद्धा हे चांगले नाही केले. दारात आलेल्या लक्ष्मीला लाथाडले. नाकारले . याचे परिणाम भोगावे लागतील, लक्षात ठेवा.

**क्रमशः**

**सौ. प्राजक्ता प्रणव देव**
**पिरंगुट - ८७६६५८३९२**

# पर्यावरण संवधर्न: काळाची गरज

**झाडे लावू झाडे वाढवु**
**रोज ऐकतो हाच नारा**
**वंदे मातरम वंदे मातरम**
**सुजलाम सुफलाम् मलयजशीतलाम्**

बंकीमचंद्र चटजी यांनी लिहिलेल्या या गीताचा जयघोष करत अनेक स्वातंत्र्यवीरांनी आपल्या प्राणांचे बलिदान केले. या गीतात भारतातील निसर्ग आणि पर्यावरण यांचे रसभरीत वर्णन आले आहे. खरेच! भारत देश हा 'गरिबांचा श्रीमंत देश आहे'. निसर्गाने भारताला बरेच काही बहाल केले आहे. या 'आसेतूहिमाचल' भूमीला विविध प्रकारची झाडे, फुले, प्राणी, पक्षी,खनिजे आणि फळांचे वरदान मिळाले आहे. त्यामुळेच भारतभूमी सुजलाम्‌ सुफलाम्‌ झाली आहे. महासागर, नद्या, पर्वत रांगा, बर्फाच्छादित डोंगर कडा यामुळे भारतातील सर्व भाग नयनरम्य वाटतो. या निसगर्शोभेमुळे कवी त्यांची प्रतिभाशक्ती फुलवित कवितेतून निसर्गाचे वर्णन करतात.

**हिरवे हिरवे गार गालिचे**
**हरित तृणांच्या मखमालीचे**

या काव्यपंक्तीत बालकवींनी निसर्गाचे, वसुंधरेचे अप्रतिम वर्णन केले आहे. या वसुंधरेच्या कुशीत वाढून मानवाने आपला उत्कर्ष साधला आहे. त्याला या निसर्गाचा लळाच लागला आहे. सातशे पन्नास वर्षापूवी तुकारामांनी वृक्षवल्लींना साद घातली होती आणि निसर्गाशी नातेच जोडले होते.

'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे' विसाव्या शतकात विनोबांनी 'निसर्गाकडे वळण्यास' सांगितले. महात्मा गांधींनी 'खेड्याकडे चला' म्हणजेच निसर्गाशी नाते साधण्याचा संदेश दिला.

'दिधले असे जग तया, आम्हांस खेळावया' 'आम्ही कोण म्हणोनि काय पुसता?' असे म्हणत या विद्रुप मानवाने सर्वांगसुंदर वसुंधरेला विद्रूप करण्याचा विडाच जणू काही उचलला आहे. आणि हे मानवाच्या प्रत्येक कृतीतून प्रतीत होत आहे.

मानवाचे अस्तित्व पूर्णतः पर्यावरणावर अवलंबून आहे हे कळत असूनही मानवाने स्वतःच्या डोळ्यावर झापडे लावली आहेत. आज वातावरणाचे तापमान भयानक वाढलेले आहे. ओझोन वायूचे संरक्षण कवच विरळ होत आहे. पूवी वीस-पंचवीस फुटावर विहिरीला लागणारे पाणी आता दोनशे ते अडीचशे फुटांवर लागते. भूकंप, दुष्काळ, अतिवृष्टी, उष्माघात, हिमालयातील बर्फाचे विरघळवून पाण्याची पातळी वाढणे या सार्या गोष्टींचा मानवी जीवनावर विपरित परिणाम होत आहे. पर्यावरण संवर्धन करणे आपली जबाबदारी आहे हे मानव विसरला आहे.स्वतःच्या सोयीसुविधा आणि ऐषोआरामासाठी मानव पर्यावरणाची अपरिमित हानी करत आहे.वृक्षांची बेसुमार कत्तल करत आहे.त्याचे घातक परिणाम शेवटी विषारी वायुंची प्रचंड वाढ झाली आहे.अनेक दुर्धर अशा रोगांना त्याला बळी पडावे लागत आहे.जगभर दरवषी ५ जून हा दिवस ' जागतिक पर्यावरण दिन' म्हणून साजरा केला जातो. पर्यावरणाची गुणवत्ता वाढवणे समस्या व संवधर्नाविषयी जागरूकता निर्माण करणे आणि पर्यावरण विषयी निर्णय घेण्याची क्षमता निर्माण व्हावी म्हणून पोषक वातावरणाची निमिती करणे हा पर्यावरण दिन साजरा करण्यामागचा मुख्य हेतू आहे. या पर्यावरणदिनी वृक्षारोपण करून त्यांची जोपासना करणे हा मुख्य हेतू ठेवून वृक्षलागवड केली जाते. मानवाने आधुनिकीकरणाच्या नावाखाली जो पर्यावरणाचा ऱ्हास केला आहे त्याचे योग्य प्रकारे संवर्धन केले जाते. वृक्षांपासून आपणाला प्राणवायु तर मिळतोच परंतु त्याचे अनेक फायदे आपणाला आतापर्यंत मिळालेले आहेत. त्यामुळे आज-काल आधुनिकीकरणाच्या नावाखाली कारखानदारी आणि निरनिराळ्या उद्योगधंद्यांनी हवेतील घटकांची हानी केली आहे त्याची भरपाई होते. शिवाय जल, हवाप्रदूषणापासून मानवाला चांगले जीवन जगता यावे हा शुद्ध हेतू ठेवून पर्यावरणाचे संवर्धन केले जाते. पर्यावरण प्रदूषण व पर्यावरणाचा होणारा त्रास ही आज जागतिक समस्या बनली आहे. त्यासाठी मानवाच्या इच्छा आकांक्षा कारणीभूत आहेत. मानव विसरला म्हणून सजीव सृष्टीवर पर्यावरण प्रदूषणाचा महाराक्षस झेप घेऊ लागला आहे. पृथ्वीला प्रदूषणापासून वाचविण्यासाठी पावले उचलायला हवीत. वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन प्रकल्प हाती घेऊन राबविले पाहिजेत. प्रदूषणविरहित वाहने वापरून सहकार्य करायला हवे. आपल्या मागील पिढ्यांनी पर्यावरणाचे आणि निसर्गाचे रक्षण करून आपणाला त्याची मधुर फळे खाण्यासाठी मिळत आहेत तेच पुढील पिढीसाठी आपण हे द्यावे हे आपले परम कर्तव्य आहे.

निसर्गाचा उपयोग करून मानवाने जन्मदर वाढवला आहे. त्यामुळे मृत्यूदर कमी झाला आहे. लोकसंख्यावाढीचा भस्मासूर इतका फोफावलाय की निसर्गाला गिळंकृत करण्यासाठी पुढे सरसावला आहे. माणूस स्वतःचा विकास साधण्यासाठी निराळे उद्योगधंदे सुरू करतो. त्यातून निघणारे कार्बनकण, विषारी वायू,मळी यामुळे प्रदूषण वाढत आहे. अनेक जडीबुटी,झाडपाला दुर्धर रोगांवर उपचार म्हणून वापरतात. शिवाजी महाराजांनी आपल्या आज्ञापत्रात झाडांचे महत्त्व विषद करून 'एक मूल एक झाड' संकल्पना मांडली होती. रविंद्रनाथ टागोर म्हणत,₹ झाड लावल्यावर त्याला पाणी घालणे ते जतन करणे व त्याचे संरक्षण करणे हे प्रत्येकाला त्याचे स्वतःचे धार्मिक व राष्ट्रीय कर्तव्य वाटले पाहिजे₹.

निसर्गाचा समतोल राखायचा तर वनीकरण मोहिम उघडायला हवी व प्रत्येकाने संकल्प करायला हवा.

**झाडे लावू झाडे जगवू**
**हिरवळ करूया अवनिवरी**
**प्रकृतीचे संरक्षण करूनी**
**विकृती पळवू दूरवरी**
**सृष्टीचा हा नियम पाळला नाही तर**
**हा नाश थांबवा तनमन**
**भुमातेचे जळते आहे**
**ही वसुंधरा जनसंख्येच्या**
**भाराने रडते आहे**

असे चित्र सगळीकडे पाहायला मिळेल. महात्मा गांधींनी म्हटलेच आहे आपल्या गरजा भागवण्यासाठी निसर्ग पुरेसे देतो, परंतु आपल्या अमर्याद लालसांची पूतर्ता करण्यास मात्र तो असमर्थ आहे. कर्मधमर्संयोगाने निसर्गावर ही वेळ येऊ नये. देताना निसर्गाने मानवासाठी इतके द्यावे की मानवाने त्याचे अस्तित्वच पुसून टाकावे. परंतु युवापिढीने हिरिरीने भाग घेऊन जनजागृती केली तर निसर्गातही चमत्कार होतील. प्रदूषणमुक्त निसर्ग पाहताना आम्हीही म्हणू,

**नेहमीच येतो मग पावसाळा**
**हे सृष्टीचे कौतुक जाण बाळा**

आणि आपली मुलेबाळे देखील पावसात चिंब भिजत आनंदाने पावसाचे गाणे म्हणतील,

**येरे येरे पावसा तुला देतो पैसा**
पैसा झाला खोटा पाऊस आला मोठा

**सौ. भारती दिलीप सावंत**
**खारघर, नवी मुंबई**
**9653445835**

मुख्य *संपादक : नरेश विठ्ठल देसाई हे दैनिक राजदंड मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राणे प्रकाशन प्रा. लि., सर्व्हे नं. १२९, हिस्सा नं. ११ / २ आणि १ / १३, वारजे पुणे - ४११ ०५८ येथे मुद्रित करून न्याती ग्रँडीयर, १०२ ग्रीनविच, कडनगर, उंड्री, पुणे -४११ ०६० येथून प्रकाशित केले. दैनिक राजदंडमधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. (*पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी) दूरध्वनी : पुणे (०२०)२६९०९०३१, इमेल-rajdand.pune@gmail.com
या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या लेख, बातम्या, जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील.

# पुण्यात आता घरोघरी मराठा व खुल्या प्रवर्गाचे होणार सर्वेक्षण

पुणे : मराठा समाजाच्या मागासलेपणाचे निकष निश्चित केल्यानंतर राज्य मागासवर्ग आयोगाने आता घरोघरी मराठा व खुल्या प्रवर्गाचे सर्वेक्षण करण्याची तयारी सुरू केली आहे. जिल्हा प्रशासनाकडून यासाठी आवश्यक कमर्चारी वर्ग पुरविण्याचे नियोजन करण्यात येत असून, सर्वेक्षणासाठीचे आदेश जिल्हाधिकारी दोन दिवसांत काढणार आहेत. त्यानंतरच पुणे जिल्ह्यात प्रत्यक्ष सर्वेक्षणाला सुरुवात होणार आहे.

राज्य मागासवर्ग आयोगाने प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांसह महापालिकेच्या आयुक्तांना पत्र पाठवून या सर्वेक्षणाच्या तयारीच्या सूचना दिल्या आहेत. सर्वेक्षण जानेवारी महिन्यात करण्यात येणार आहे. सर्वेक्षणासाठी जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी, तर एक उपजिल्हाधिकारी सहायक नोडल ऑफिसर असेल. प्रत्येक तालुका स्तरावर तहसीलदार आणि नायब तहसीलदार हे अनुक्रमे नोडल ऑफिसर आणि सहायक नोडल ऑफिसर असतील. शहर पातळीवर महापालिका आयुक्त आणि उपायुक्त यांच्यावर ही जबाबदारी असणार आहे.

पुणे जिल्ह्यातील सर्वेक्षणाच्या तयारीला जिल्हा प्रशासनाने सुरुवात केली आहे. राज्य मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष न्यायमूती सुनील शुक्रे यांच्या अध्यक्षतेखालील समितीने मराठा समाजाचे मागासलेपण निश्चितीसाठी सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक आधारावर निकष अंतिम केले आहेत. निकषांच्या आधारे राज्यातील मराठा समाजाचे सर्वेक्षण केले जाणार आहे. सर्वेक्षणासाठी गरजेनुसार तलाठी, ग्रामसेवक, शिक्षक, अंगणवाडी सेविका; तसेच इतर सरकारी कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली जाणार आहे. त्याकरिता जिल्ह्यातील सर्व सरकारी कर्मचाऱ्यांची माहिती उपलब्ध करून देण्याच्या सूचना आयोगाने जिल्हाधिकाऱ्यांना केल्या आहेत.

महापालिका, नगरपालिका; तसेच गावस्तरावर सर्वेक्षणासाठी एक नमुना अर्ज तयार केला आहे. सरकारी कर्मचाऱ्यांना घरोघरी जाऊन संबंधित व्यक्ती मराठा समाजाची असल्यास तशी नोंद करावी लागणार आहे. याच अर्जात एकूण लोकसंख्या स्पष्ट करावी लागणार आहे. त्यातून संबंधित गावात किंवा शहरात एकूण लोकसंख्येत मराठा समाजाचे प्रमाण किती आहे याचे चित्र स्पष्ट होणार आहे. त्यासोबतच आयोगाने निश्चित केलेल्या निकषांनुसारही प्रश्नावलीत उत्तरे लिहिली जातील. त्या आधारे संबंधित व्यक्तीचे मागासलेपण ठरवले जाईल. सर्वेक्षणातील माहिती गोखले इन्स्टिट्यूटकडे हस्तांतर केली जाईल. इन्स्टिट्यूटने तयार केलेल्या सॉफ्टवेअरमध्ये ही माहिती भरून त्याचा अहवाल केला जाणार आहे, असेही सांगण्यात आले.

मागासवर्ग आयोगाने सुचविलेल्या मराठा व खुल्या प्रवर्गाचे सर्वेक्षण जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत तातडीने करण्याचे ठरवण्यात आले आहे. पुणे जिल्ह्यासाठी येत्या दोन दिवसांत जिल्हाधिकारी आदेश जारी करणार आहेत. जनगणनेच्या धतीवर त्या पद्धतीने हे सर्वेक्षण करण्यात येईल. सर्व तहसीलदारांना या संदर्भात सूक्ष्म नियोजन करण्याचे सूचना दिल्या आहेत.- ज्योती कदम, निवासी उपजिल्हाधिकारी

मराठा आरक्षणाचा गुंता वाढत चालला आहे. त्या पाश्वर्भूमीवर २० जानेवारीला मराठा आरक्षणासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. यापूवी न्यायालयानेच मागासवर्ग आयोगाच्या अहवालानुसार मराठा समाजाचे मागासलेपण सिद्ध करता येईल, असे म्हटले आहे. या सुनावणीवेळी राज्य सरकारचा मागासलेपणासंदर्भातील अहवाल सर्वोच्च न्यायालयात सादर केला जाईल, अशी शक्यता आहे. त्यामुळेच हे सर्वेक्षण येत्या २० जानेवारीपूवी पूर्ण करण्याचे आव्हान जिल्हा प्रशासनापुढे आहे. या सर्वेक्षणासाठी आता जिल्ह्यतील सर्व सरकारी यंत्रणा कामात गुंतणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# तूरडाळ झाली स्वस्त



**नाशिक :** जवळपास वर्षभरानंतर तूरडाळीच्या दरांत घसरण होण्यास सुरुवात झाली आहे. किरकोळ बाजारात तूरडाळ १८० रुपये किलोपर्यंत तर मूगडाळ आणि इतर डाळीही शंभरीपार पोहोचल्याने सवर्सामान्यांच्या जेवणातून डाळ गायब झाली होती. मात्र, आता मागील काही दिवसांपासून तूरडाळीचे दर घसरले आहेत. किरकोळ बाजारात तूरडाळीचे दर २० रुपयांनी कमी झाल्याने सवर्सामान्यांना दिलासा मिळत आहे.

मागील वर्षभरात तूरडाळीच्या दरात तब्बल ३५ ते ४० टक्क्यांपर्यंतची वाढ नोंदविली होती. घाऊक बाजारात १६५ ते १७० तर किरकोळ बाजारात १८० रुपये प्रतिकिलोपर्यंत तूरडाळीचे दर गेले होते. मात्र, आता बाजारात नवीन माल येण्यास सुरुवात झाली आहे. डिसेंबरच्या सुरुवातीपर्यंत तूरडाळीचे दर तेजीत होते. परंतु, आता नवीन मालाची आवक होत असल्याने किरकोळ बाजारात तूरडाळ प्रतिकिलो २० रुपयांनी स्वस्त झाली आहे. बाजारात तूरडाळीसह मूगडाळही १० रुपयांनी उतरली आहे. तर चणाडाळ, मसूरडाळीचे दर स्थिर आहेत.

आता उडीदडाळीचा तोरा

यंदा अपेक्षेच्या तुलनेत पाऊस कमी झाल्याने उडीदडाळीच्या उत्पादनात घट झाली आहे. त्यामुळे एकीकडे इतर डाळी स्वस्त होत असतानाच किरकोळ बाजारात उडीदडाळ काही प्रमाणात महागली आहे. किरकोळ बाजारात उडीदडाळ दहा रुपयांनी वाढली असून, १३० रुपये प्रतिकिलोप्रमाणे तिची विक्री होत आहे.

तूरडाळीची चढ-उतार अशी

- उत्पादन कमी असल्याने वर्षाच्या सुरुवातीपासूनच दर वधारले
- जुलैमध्ये तूरडाळ १४० रुपये किलोवर
- दिवाळीच्या पाश्वर्भूमीवर ऑक्टोबरमध्ये प्रतिकिलो दर १७० रुपयांपर्यंत
- नोव्हेंबर अखेरपर्यंत किरकोळ बाजारात दर १८० रुपयांपर्यंत पोहोचले
- डिसेंबरमध्ये डाळींची आवक वाढली
- डिसेंबरच्या तिसऱ्या आठवड्यापासून दर घसरण्यास सुरुवात

# मुंबईत वसंतदादा पाटील प्रतिष्ठानच्या इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये तोडफोड

**मुंबई:** वसंतदादा पाटील प्रतिष्ठानच्या चुनाभट्टी येथील इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये तोडफोड करण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. या महाविद्यालयात ३० ते ४० जणांच्या जमावासह ताबा धरल्याप्रकरणी कराड येथील मोकाशी कृषी विकास प्रतिष्ठानचे जनरल सेक्रेटरी अभिजित मोकाशी आणि व्हाईस प्रेसिडेंट विश्वजित मोकाशी यांच्यावर वडाळा पोलिस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला. सध्या वडाळा पोलीस या प्रकरणाची सखोल चौकशी करत आहेत. याबाबतची अधिक माहिती अशी की , चुनाभट्टी येथील वसंतदादा पाटील प्रतिष्ठान च्या इंजिनिअरिंग महाविद्यालयात २६ ऑगस्टला विश्वजित मोकाशी , अभिजित मोकाशी, शेखर पाटील , हनुमंत फाळके आणि अशोक मांढरे यांच्यासह ४० ते ५० जणांच्या गटाने हल्ला केला.

जमावापैकी काहीजणांकडून महाविद्यालयात उपस्थित असणाऱ्या प्रा.रणजित मोरे यांना मारहाण करण्यात आली .तसेच महाविद्यालयाच्या रिसेप्शनमधून चाव्या हिसकावून घेतल्या. तसेच ट्रस्टी ऑफिसचे कुलूप तोडून जमाव आतमध्ये शिरला. या जमावाने महाविद्यालयातील सीसीटीव्ही ,डीव्हिआरची तोडफोड केली . त्याच दरम्यान १०० क्रमांकावर ही माहिती पोलिसांना कळवण्यात आल्याने पोलिस तात्काळ महाविद्यालयात पोहोचल्याने पुढील अनर्थ टळला .

यासंदर्भात वडाळा पोलिस स्टेशन मध्ये भारतीय दंडसंहिता कलम ४१८, १४१, १४३, १४७, १४९, ५९४, ५०६, ३२३, ४२७ आणि ४५२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे . कलम ४५२ हे कलम घुसखोरी करून ताबा घेण्याचा प्रयत्न करण्याच्या गुन्ह्यासाठी लावले जाते. हा अजामीनपात्र असताना गुन्हेगारांना अद्याप अटक का करण्यात आली नाही, असा सवाल फिर्यादी रणजित मोरे यांनी उपस्थित केला आहे.

# पेट्रोल मिळणार नसल्याची अफवा, घाईघाईने पेट्रोल पंपाकडे जाताना अनर्थ

**सोलापूर:** सोमवारी रात्री पासून सोलापुरात पेट्रोल मिळणार नाही अशी अफवा पसरली होती. मंगळवारी दिवसभर शहरातील काही पेट्रोल पंप बंद होते. पेट्रोल भरण्याच्या घाई गडबडीत पंपाकडे जाताना बाईकस्वाराचा नाल्यात पडून मृत्यू झाला आहे. पेट्रोल आणण्यासाठी पंपाकडे जात असताना दुचाकीवरील ताबा सुटल्याने बाईकसह नाल्यात पडला. नागरिकांनी जखमी दुचाकी वाहनधारकास शासकीय रुग्णालयात दाखल करण्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाला. सोमवारी रात्री ११:३० च्या सुमारास मुळेगाव तांडा रोडवरील नाल्यात हा अपघात झाला. शिवशंकर नागनाथ मरगल (वय- ४१, रा. सग्गम नगर, जुना विडी घरकूल, सोलापूर) असे मयत बाईकस्वाराचे नाव आहे.

मयत बाईकस्वार शिवशंकर मरगल सोमवारच्या रात्री ११:३० च्या सुमारास जुना विडी घरकूल, सग्गम नगर येथून पेट्रोल पंप बंद राहणार असल्याचे कळाल्याने रात्रीच बाईकमध्ये पेट्रोल भरण्यासाठी सोलापूर हैदराबाद महामार्गावर असलेल्या सोन्या मारुती पेट्रोल पंपाकडे चालला होता.शहरातील पेट्रोल पंपावर चिक्कार गदी आहे म्हणून शिवशंकर हायवे कडे सुसाट निघाला होता.सर्व्हिस रोडचा अंदाज न आल्याने अचानक त्याचा वाहनावरील ताबा सुटला आणि तो बाईकसह मुळेगाव तांड्याच्या अलिकडे असलेल्या नाल्यात जावून कोसळला.



शिवशंकर मरगल या दुचाकीधारकाच्या डोक्याला गंभीर मार लागला होता. घटनास्थळी तो बेशुद्ध अवस्थेत पडला होता. नाल्यात दुचाकी पडल्याने ये जा करणाऱ्या वाहनधारकांच्या लक्षात आले.त्यांनी शिवशंकरला बाहेर काढले व नातेवाईकांना माहिती दिली. या घटनेची वार्ता समजताचा नातलग नाल्याकडे धावले. बेशुद्धावस्थेत त्याला मंगळवारी रात्री १ वाजता त्याचा मेव्हणा भास्कर याने येथील शासकीय रुग्णायलात दाखल केले. डॉक्टरांनी तपासून त्याचा उपचारापूवीच मृत्यू झाल्याचे घोषित केले.

मयत शिवशंकर याच्या पश्चात पत्नी, दोन मुले असा परिवार आहे. एक मुलगी १२ वी दुसरा मुलगा इयत्ता ९ वीत शिकत असल्याचे त्याचे नातलग भास्कर म्हाडा यांनी सांगितले.

विडी घरकुल येथील बीआरएस पक्षाचे धडाडीचे कार्यकर्ता व माजी पालकमंत्री तथा भाजप आमदार विजयकुमार देशमुख यांचा कट्टर समर्थक म्हणून शिवा मरगल याची ओळख होती. सोलापूर शहरात तीन पेट्रोल बंद राहणार या अफवेन शिवाचा बळी गेला.शहरात पेट्रोल पंप बेमुदत बंद राहणार अशी अफवा पसरल्याने सर्वच जण आपल्या सोयीसाठी मिळेल त्या पेट्रोलपंपावर जाऊन आपल्या वाहनात पेट्रोल भरण्यासाठी पंप गाठत होते.शिवा देखील सोलापूर हैदराबाद रोड वरील गदी नसते म्हणून पेट्रोल भरण्यासाठी निघाला होता.पेट्रोल भरुन घराकडे येत असताना महामार्गावर सुरू असलेल्या रस्त्याच्या कडेला व्यवस्थित सर्व्हिस रोड न केल्याने कच्या रस्त्यावरून पक्क्या रस्त्यावर चढताना त्यांचा गाडीवरील तोल गेल्याने ते खाली फरफटत ब्रीजच्या खाली कोसळलं. आणि जीव गमावून बसला.शिवाच्या निधनाची माहिती कळताच बीआरएस पक्षाचे स्थानिक नेते माजी नगरसेवक नागेश वल्याळ, प्रभागातील भाजपाचे सामाजिक कार्यकर्ते तथा शिवा मरगल यांचे मित्र सतीश भरमशेट्टी यांच्यासह शिवा मरगल यांचं मित्रपरिवार त्यांच्या निवासस्थानी गदी केली होती.मंगळवारी रात्री उशिरा शिवावर अंतिम संस्कार करण्यात आले.

# मुंबईत ऑनलाइन गांजा विक्रेता अटकेत



**मुंबई :** समाजमाध्यमांवर ग्राहकांचा शोध घेऊन गांजाची विक्री करणाऱ्या एका २१ वषीय तरुणाला नवघर पोलिसांनी अटक केली. आरोपीच्या ताब्यातून पोलिसांनी गांजा हस्तगत केला असून याप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत. अटक करण्यात आलेल्या तरुणाचे नाव शुभम घाडीगांवकर असून तो मुलुंडमधील नवघर परिसरात वास्तव्यास होता. दोन दिवसांपूवी नवघर परिसरात पोलीस वाहनांची तपासणी करीत असताना शुभम दुचाकीवरून तेथे आला. पोलिसांनी त्याला थांबण्याचा इशारा केला. मात्र तो पोलिसांना पाहून पळू लागला. त्यामुळे पोलिसांनी तत्काळ त्याचा पाठलाग करून काही अंतरावर त्याला ताब्यात घेतले.

पोलिसांनी त्याची झडती घेतली असता त्याच्या गाडीमध्ये ४०० ग्राम गांजा सापडला. पोलिसांनी त्याची कसून चौकशी केली असता समाजमाध्यमांवर ग्राहक शोधून गांजाची विक्री करीत असल्याची कबुली त्याने दिली. पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल करून त्याला अटक केली. शुभमला गांजाचा पुरवठा करणाऱ्या आरोपींचा पोलीस शोध घेत आहेत.

# हॉटेलसाठी सुप्रिया पाठारेंनी विकले सगळे दागिने



पुढचं पाऊल, मोलकरीण बाई, होणार सून मी ह्या घरची, जागो मोहन प्यारे, ठिपक्यांची रांगोळी अशा बऱ्याच मालिकांमधून घराघरात पोहोचलेल्या सुप्रिया पाठारे नेहमी चर्चेत असतात. त्यांच्या महाराजा हॉटेलमुळे त्या सातत्याने चर्चेत असतात. या हॉटेलविषयी सोशल मीडियावरद्वारे सुप्रिया पाठारे नवनवीन अपडेट देत असतात. मध्यंतरी हे हॉटेल सतत बंद केलं जात होतं आणि अखेर दोन महिन्यांनंतर त्यांचं हॉटेल सुरळीत सुरू झालं. पण हॉटेल सुरळीत सुरू करण्यासाठी सुप्रिया पाठारे यांना अनेक गोष्टींचा सामना करावा लागला. यासाठी त्यांनी स्वतःचे सगळे दागिने विकले, याचा खुलासा नुकताच त्यांनी एका मुलाखतीमधून केला.


अभिनेत्री सुप्रिया पाठारे यांनी गेल्यावर्षी ऑगस्ट महिन्यात लेकाच्या साथीने महाराजा हॉटेल सुरू केलं होतं. त्यानंतर या हॉटेलला अनेक कलाकार मंडळी हजेरी लावू लागले. हॉटेलला खूप चांगला प्रतिसाद मिळत होता. पण काही काळाने या हॉटेलवर अनेक संकट आली. कधी हॉटेलचा स्टाफ पळून गेला, तर कधी लेक मिहिरा पाठारेला इजा झाली. यामुळे हॉटेल दोनदा बंद करावं लागला. यामुळे सुप्रिया पाठारे मोठ्या तोट्यात गेल्या. पुन्हा हॉटेल सुरू करण्यासाठी त्यांनी दुसऱ्याकडून पैसे न मागता स्वतःचे दागिने विकले.

युट्यूब चॅनेलशी बोलताना अभिनेत्री सुप्रिया पाठारे म्हणाल्या, मी यावेळेला सगळे दागिने विकून सगळ्या गोष्टी केल्या. कारण आलेल्या संकटांमधून बाहेर पडणं अशक्य होतं. कोणाकडून पैसे घ्यायचे, मग आपलं सगळं व्यवस्थित करायचं ते ठीक आहे. पण मला अंदाज नव्हता किती महिने असं काढावं लागणार आहे. त्यामुळे ज्याच्याकडून पैसे घेतलेत त्याला किती वेळ तंगवत ठेवायचं, हे मला पटलं नाही.

मला असं वाटतं स्त्री धन म्हणतात ते त्याच्यासाठीच असतं. स्त्रीच्या अडचणीसाठी उपयोगात आणलेलं ते स्त्री धन म्हणू. त्यामुळे ते मी उपयोगात आणलं आणि मला त्याचं काही वाईट वाटतं नाही. अरे यार मला याच्यासाठी हे करावं लागलं. ठीक आहे ते माझं स्वप्न आहे, मुलाचं स्वप्न आहे. ते उभं राहण्यासाठी कराव्या लागतायत त्या गोष्टी कराव्यात. पण या सगळ्यासाठी सावध असावं लागतं, असं सुप्रिया पाठारे म्हणाल्या.

# भांडवली अर्थव्यवस्थेमुळे आजचे चित्रपट फक्त श्रीमंताचे - जावेद अख्तर

**छत्रपती संभाजीनगर:** श्रीमंतांसाठी जशा शाळा, रुगणालये उघडली गेली. तशी आता श्रीमंतांसाठी स्वतंत्र चित्रपट निमिती सुरू झाली आहे. पूवी छोट्या शहरातील नायक असू द्या असे लेखकाला सांगितले जायचे. आता फक्त ह्यमल्टिप्लेक्सह्णसाठी चित्रपट बनतो आहे. कारण आता संपत्तीचे केंद्रीकरण शहरी भागात झाले आहे. गूळ असेल तिथेच तर मुंगळेही असतील. ते तत्त्व आता चित्रपटांना लागू झालेले दिसते, असे परखड मत लेखक जावेद अख्तर यांनी व्यक्त केले. वेरुळ-अजिंठा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात गुरुवारी त्यांची दिग्दर्शक जयप्रद देसाई यांनी प्रकट मुलाखत घेतली.



समाज आणि चित्रपटातील संभ्रमित अवस्थेबाबत बोलताना जावेद अख्तर म्हणाले, ह्यसमांतर मूल्य आणि आशाआकांक्षा या दोन्ही समोर एक वळण आले आहे. पुढचे काही न दिसणारे. जिथे चांगले वाईट काही कळत नाही. बाजारपेठ आणि उदारीकरण यातून जाताना आपण हा शब्द आता मी बनतो आहे. कारण बाजारातील भांडवलही काम करत असते. येथे आपण स्वतः काय करतो आणि समाजासाठी काय करतो आहोत हेच कळनासे झाले आहे. भांडवली बाजारपेठेचा अजेंडा काम करत असतो. पण अशा काळात लोक फायद्याचा विचार करत राहतात. पण अशा स्थितीमध्येही दुःखी होऊन चालणार नाही. या देशावर औरंजेबाने ५१ वर्षे राज्य केले. पण हा देश हिंदुस्थानच राहिला. कारण जसे गंगा-जमुनेचे असते त्याच्या पृष्ठभागावरचे पाणी दिसते. पण एक न दिसणारा सरस्वतीचा प्रवाह आतून जात असतो. सहा हजार वर्षांची या देशाची सांस्कृतिक वीण लगेच बदलणारी नाही. तीन सभा, चार माणसांच्या वागण्याने त्यात फार फरक पडणार नाही. ती सांस्कृतिक वीण तो इतिहास हाच आपला आणि आपल्या देशाचा ह्यआत्माह्ण आहे. त्यामुळे संभ्रमित अवस्थेतील गोष्ट पुढे नेताना चित्रपटांमध्ये जसा नायक सापडत नाही तसेच खलनायकही सापडत नाही.

देशातील चित्रपट बनविणाऱ्यांचा बुद्धयांक कदाचित एक अंकी असेल. पण १९६० च्या दशकातील नायक हा कोठे तरी नोकरी करणारा, मजूर, प्राध्यापक, डॉक्टर असा काम करणारा माणूस होता. आताच्या नायकाला स्वतः चे विशेषाधिकार असतात. देशातील कोणत्याही सामाजिक प्रश्नाशी त्याचे काही देणे- घेणे असत नाही. तो स्वित्झरलंडमध्ये जगतो. शहरी भागात वाढतो, त्याच्यासमोर कोणतेही प्रश्न नसतात. त्यामुळे तो काही कामबीम करत नाही. तो आपल्याशी नातेच सांगत नाही. कारण जसे श्रीमंतांसाठी हॉटेल आहेत, रुग्णालये आहेत. तसाच आताचा चित्रपटही श्रीमंताचा झाला आहे. खरेतर व्यावसायिक चित्रपट समाजाचे एकात्म चित्र असते. त्यामुळेच व्यावसायिक चित्रपट मोठा व्यवसाय करतात. त्यामुळे समाजातील अस्वस्थता आता चित्रपटात दिसून येत नाही. १९४०-५० च्या काळातील जमीनदार-ठाकूर आता चित्रपटांमध्ये दिसत नाहीत. त्या पुढच्या काळात शहरीकरणातून आलेला झोपडपट्टी दादा चित्रपटांमध्ये आला. तो पुढे नायकही बनला. पुढे तो भ्रष्टाचार, अन्याय या विरोधात लढला. पुढच्या काळात भ्रष्टचार, अन्याय हे खलनायक होते. काही दिवस चित्रपटांनी पाकिस्तानाही खलनायक करून पाहिले. आता तोही पर्याय उरलेला नाही. त्यामुळे चित्रपटांना आता खलनायकही उरलेला नाही. त्यामुळे मूल्य, आशा निर्माण करणार जसा नायक नाही तसेच आताच्या चित्रपटांमध्ये खलनायकही उरलेला नाही. परिणामी नाच-गाणी असा काही आशय नसणारा चित्रपट उभा राहतो आहे.

कवितेला भांडवल लागत नाही. चित्रपटांना ते लागते. जिथे भांडवल लागते तिथे त्याच्या मागण्याही असतात आणि भांडवली अर्थव्यवस्थेच्या मागण्याही असतात. त्यामुळे चित्रपटांमध्ये लिहिलेले गीत हे त्या पात्रांचे किंवा त्या चित्रपट समूहाचे असते. शायरी आणि कवी म्हणून लिहिलेली बाब वेगळी आणि चित्रपटात जसा नायक- नायिका जशी भूमिका वठवतात तसेच गीतकारही भूमिका वठवत असतात, असे मत जावेद अख्तर यांनी मांडले.

**भाषेत नवे शब्द आले तरच ती वाढेल**

अनेक शब्द भाषेत मिसळून गेले तरच ती भाषा वाढते. अनेक फारसी, हिंदी, उर्दू, इटाली, इंग्रजी, पर्शियन शब्दांना आपण हिंदीचे व्याकरण लावले आहे. इंग्रजी गरजेची आहेच. पण प्रादेशिक भाषा आपण शिकवतच नाही. मातृभाषा आता झोपडपट्टीत गेली आहे. त्यावर तसेच संस्कार झाले आहेत. त्यामुळे प्रादेशिक भाषाच बदलली आहे. माध्यमांमधून येणारी भाषा ही अशीच दीन झाली आहे. त्याचे पडसाद आता सर्व समाजात दिसतात असे सांगत जावेद अख्तर यांनी दिल्ली पोलिसांनी उर्दू शब्द काढून टाकण्याच्या परिपत्रकावर टीका केली.

# रणबीर, रणवीर, आयुष्मान हे सर्वाधिक १०० कोटी हुन अधिकचे हिट सिनेमा दिलेले टॉप ३ युवा अभिनेते



चित्रपट उद्योगातील स्टारडमचा बेंचमार्क म्हणजे एखाद्या अभिनेत्याने बॉक्स ऑफिसवर दिलेल्या १०० कोटी+ हिट्सची संख्या. तर, बॉलीवूडच्या तरुण पिढीतील टॉप बॉक्स ऑफिसवर कोण आहेत? त्यांच्या बॉक्स ऑफिस नंबरवर एक नजर टाकली तर आकडेवारीनुसार तीन नावं आहेत जी आजच्या पॅकच्या शीर्षस्थानी आहेत - रणबीर कपूर, रणवीर सिंग आणि आयुष्मान खुराना!


रणबीर कपूरचे सात ब्लॉकबस्टर चित्रपट आहेत ज्यांनी १०० कोटींहून अधिक कमाई केली आहे. ते आहेतःएनिमल (सवर्कालीन ब्लॉकबस्टर), तू झुटी मैं मकर, ब्रह्मास्त्र, संजू, ए दिल मुश्किल, ये जवानी है दिवानी आणि बर्फी.

रणवीर सिंग चे ही बॉक्स ऑफिसवर ७०० कोटींचे चित्रपट आहेत. ते आहेतः रॉकी और रानी की प्रेम कहानी, ८३, गली बॉय, सिम्बा, पद्मावत, बाजीराव मस्तानी आणि राम लीला.

आयुष्मानने यादरम्यान जगभरातील पाचशे कोटी हिट्स मिळवले आहेत! ते आहेतः बाला, ड्रीम गर्ल, बधाई हो, ड्रीम गर्ल २ आणि अंधाधुन!

विशेष म्हणजे, रणबीर, रणवीर आणि आयुष्मान यांच्यात एकोणीस १०० कोटी+ हिट आहेत!

# कतरिना कैफ-विजय सेतुपती यांचा मेरी खिसमसमध्ये 'नजर तेरी तुफान' हे गाणं प्रेक्षकांच्या भेटीला



अभिनेत्री कतरिना कैफ आणि विजय सेतुपती स्टारर ₹मेरी खिसमस₹ ची हवा सोशल मीडिया वर असताना आज या चित्रपटातील ₹नजर तेरी तुफान₹ हे नवीन गाणं प्रेक्षकांच्या भेटीला आलं आहे. या नवीन गाण्याच्या रिलीजने चाहत्यांमध्ये आणि संगीत रसिकांमध्ये उत्साहाचा वाढला आहे.

मनमोहक चाल आणि मनमोहक गीतांनी हे गाणे संगीत उद्योगात धुमाकूळ घालत आहे. प्रख्यात संगीत दिग्दर्शक प्रीतम चक्रवती यांनी संगीतबद्ध केलेले ₹नजर तेरी तुफान,₹ हे गाणं पारंपारिक आणि समकालीन संगीताचा मिलाफ आहे. प्रीतमचा सिग्नेचर टच या गाण्यातून दिसून येतोय. पापोनने हे गाणे सुंदर गायले आहे आणि प्रख्यात गीतकार वरुण ग्रोव्हर यांनी हे गाणं लिहिलं आहे. श्रीराम राघवनच्या ₹मेरी खिसमस₹ मधील कतरिना कैफ आणि विजय सेतुपती यांची ऑन-स्क्रीन केमिस्ट्री प्रीतमच्या संगीताने बहरणार आहे.

संजय कपूर, विनय पाठक, प्रतिमा काझमी, टिन्नू आनंद, अश्विनी काळसेकर आणि राधिका आपटे यांच्या प्रमुख भूमिका या चित्रपटात बघायला मिळणार असून 12 जानेवारी 2024 रोजी हा चित्रपट चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. तमिळ आवृत्तीमध्ये, कतरिना आणि विजय राधिका सरथकुमार, गायत्री, षणमुगराजन, काविन जय बाबू आणि राजेश विल्यम्ससोबत स्क्रीन शेअर करताना दिसणार आहेत.

# हडपसरमध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी

## क्रांतीसुर्य अन्याय अत्याचार निर्मुलन कमर्चारी संघटनेचं उद्घाटन



**हडपसर :** स्त्री शिक्षणाच्या जनक बहुजन समाज सुधारक क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती हडपसर मधील सानेगुरुजी रुग्णालयासमोर उत्साहात साजरी करण्यात आली.सावित्रीबाई फुले व थोर महापुरुषांच्या प्रतिमेस पुष्पहार क्रांतीसुर्य अन्याय अत्याचार निर्मुलन कमर्चारी संघटना हडपसर शाखा अध्यक्ष डॉ.नितीन वाघमारे , क्रांतीसुर्य अन्याय अत्याचार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष,रिपाइं महाराष्ट्र प्रदेश युवक उपाध्यक्ष गजेंद्र मोरे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले .यावेळी सामाजिक कार्यकर्ते सचिन वंजारी , मारुती कांबळे, सतीश अल्हाट, क्रांतीसुर्य अन्याय अत्याचार निर्मुलन संघटनेचे सचिव दशरथ दुनघव, खजिनदार लक्ष्मण कोळी,उपाध्यक्ष गिरासे, सहसचिव रामचंद्र शिंदे, सदस्य संदिप चोपडे,डॉ.ज्योती गवळी,डॉ.कल्पना आयरे,रविंद्र पाटील,विकास कसबे,दौलत पाटील,रविंद्र चौधरी,अनिल बोटे,गणेश गायकवाड, बंडू म्हस्के, नाना माकर सानेगुरुजी रुग्णालयातील वैद्यकीय कमर्चारी आदी मान्यवर उपस्थित होते. सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त क्रांतीसुर्य अन्याय,अत्याचार निर्मुलन कमर्चारी संघटना. सानेगुरुजी रुग्णालय आवारात उद्घाटन करण्यात आले यावेळी क्रांतीसुर्य अन्याय अत्याचार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष गजेंद्र बाबा मोरे म्हणाले की, संघटनेच्या माध्यमातून विविध क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर अन्याय अत्याचार विरोधात आवाज उठवणार,त्यांच्या समस्यां सोडवणार असल्याचे मत गजेंद्र मोरे यांनी नूतन वर्षात नवीन संघटना उद्घाटन प्रसंगी आपले मत व्यक्त केले.

# पुस्तक महोत्सवातील युवकांचा सहभाग आशादायी

**पुणे :** पुण्यात झालेल्या विश्वविक्रमी पुस्तक महोत्सवातील युवकांचा उत्साही आणि उल्लेखनीय सहभाग सर्वांत आशादायी होता. त्यामुळे सर्वांच्याच मनातील आशावाद बळकट झाला, असे गौरवोदगार अध्यक्षस्थानी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. राजा दीक्षित यांनी काढले.

अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघ, महाराष्ट्र साहित्य परिषद आणि संवाद पुणे यांच्या वतीने आयोजित कृतज्ञता सोहळ्यात ते बोलत होते. पुण्यात गाजलेल्या आणि विश्वविक्रमी ठरलेल्या पुस्तक महोत्सवाचे आयोजक राजेश पांडे आणि आनंद काटीकर यांचा यावेळी जाहीर सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ साहित्यिक आणि अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. भारत सासणे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. राजा दीक्षित होते. व्यासपीठावर साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, प्रमुख कार्यवाह सुनिताराजे पवार, अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघांचे अध्यक्ष राजीव बर्वे, प्रमुख कार्यवाह पराग लोणकर, संवाद पुणेचे सुनील महाजन उपस्थित होते.



डॉ. दीक्षित म्हणाले, पुस्तक महोत्सवाची चळवळ फोफावत जावी. पुस्तक ही जीवनावश्यक वस्तु ठरावी यासाठी शासन स्तरावर पुढाकार घेतला जावा.

डॉ. भारत सासणे म्हणाले, इंग्रजी भाषेच्या आक्रमणाची चिंता असताना भव्य पुस्तक महोत्सव आनंद देणारी बाब होती. अशा महोत्सवांना अधिक व्यापक स्वरूप देण्यासाठी महाराष्ट्रा बाहेरील लोकांनाही मराठी पुस्तक महोत्सवाशी जोडणे गरजेचे आहे. पुस्तक महोत्सवाच्या रूपाने समाजाला मोठे योगदान दिले आहे.

प्रा. मिलिंद जोशी म्हणाले, पुस्तक महोत्सव म्हणजे पुणे पॅटर्न अशी पुण्याची नवी ओळख आता निर्माण होईल इतके प्रेरक वातावरण पुस्तक महोत्सवाने निर्माण केले. पुस्तक महोत्सवातील विक्रमी उलाढाल लक्षात घेता कोण नेमकं काय वाचतं हे जाणून घेण्यासाठी वाचन संस्कृतीचे सर्वेक्षण होणे गरजेचे आहे.

प्रा. आनंद काटीकर म्हणाले, तरुण मुलं पुस्तक महोत्सवाकडे वळली याचा अधिक आनंद आहे. पुढील वषी अधिक चांगला महोत्सव करण्याचा आमचा प्रयत्न राहिल.

राजीव बर्वे यांनी स्वागत केले. पराग लोणकर यांनी प्रास्ताविक केले. सुनील महाजन यांनी मनोगत व्यक्त केले. येत्या मे महिन्यात मुलांसाठी असाच काही वाचनकेंद्रित उपक्रम घ्यावा असे आवाहन त्यांनी केले. सुनिताराजे पवार यांनी मानपत्राचे वाचन केले. अमृता कुलकणी यांनी सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन केले.

### पुण्याला बनवणार वर्ल्ड बुक कॅपिटल !

सत्काराला उत्तर देताना पुस्तक महोत्सवाचे आयोजक राजेश पांडे म्हणाले, पुस्तक महोत्सवाला मिळालेले यश हे उत्कृष्ट लोकसहभागाचे आहे. 11 कोटींपेक्षा अधिक उलाढाल ही मोठी बाब आहे. पुस्तक महोत्सव हा इव्हेन्ट न राहता ती मूव्हमेंट व्हावी असा आमचा प्रयत्न आहे. त्यामुळे पुस्तक महोत्सवाला चळवळीचे स्वरूप यावे म्हणून पुणे हे वर्ल्ड बुक कॅपिटल व्हावे असा आपला प्रयत्न आहे. त्यादृष्टीने प्रयत्न सुरू केले आहेत.

# दाऊदच्या आईच्या मालमत्तेचा होणार लिलाव

**रत्नागिरी:** कुख्यात गँगस्टर आणि दहशतवादी दाऊद इब्राहिमच्या आईच्या नावे असलेल्या चार मालमत्तांचा शुक्रवारी लिलाव होणार आहे. रत्नागिरी जिल्ह्यातल्या खेड तालुक्यात मुंबके इथे या चार मालमत्ता आहे. शेतजमिनीच्या रूपात असलेल्या चारही मालमत्ता दाऊदची आई अमिना बी यांच्या नावावर आहेत. त्यांचा लिलाव शुक्रवारी होतोय. गेल्या नऊ वर्षात दाऊद आणि त्याच्या नातेवाईकांच्या जवळपास ११ मालमत्तांचा अधिकाऱ्यांनी लिलाव केला आहे. रत्नागिरीतील मुंबके येथील डॉन दाऊद इब्राहिम याच्या चार जागांचा लिलाव होणार आहे. यामध्ये चार शेतजमिनींचा समावेश आहे.

जवळपास २० गुठ्यांहून अधिक जमिनीचा लिलाव करण्यात येणार आहे. चार जमिनीपैकी एका जमिनीची किंमत ९ लाख ४१ हजार २८० रुपये इतकी आहे. तर दुसऱ्या शेतजमिनीची अंदाजे किंमत ही आठ लाख ८ हजार ७७० रुपये इतकी आहे. मुंबके येथील जमिनींच्या लिलावाबाबत २१ नोव्हेंबर २०२३ रोजी लिलावाबाबत नोटीस काढण्यात आली होती. दाऊद इब्राहिम कासकरचे मूळ गाव हे खेड तालुक्यातील मुंबके हे आहे. या गावात त्याचा बंगला व आंब्याची बाग तर लोटे आणि खेड शहर अशा सहा ठिकाणी त्याच्या वेगवेगळ्या मालमत्ता होत्या.

# नारायणगाव महाविद्यालयात राष्ट्रीय गणित दिवस साजरा

**नारायणगाव (सा. वा) :** कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नारायणगाव, ता. जुन्नर येथे गणित विभागातर्फे महान गणितत्तज्ञ श्रीनिवास रामानुजन यांचा जन्मदिवस तथा राष्ट्रीय गणित दिवसह्व नुकताच साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉ. आनंद कुलकणी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते, विज्ञान शाखा प्रमुख डॉ. रसूल जमादार, गणित विभागप्रमुख प्रा. निलेश गावडे, प्रा. वैशाली वाघ, प्रा. अक्षय भोर तसेच प्रथम व द्वितीय वर्ष गणित विषयाचे ९० विद्यार्थी या कार्यक्रमाला उपस्थित होते.





प्राचार्य डॉ कुलकणी यांनी श्रीनिवास रामानुजन यांचा जीवनप्रवास थोडक्यात मांडला, त्यांचे मोलाचे आणि प्रेरणादायी मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळाले, डॉ. रसूल जमादार यांनी श्रीनिवास रामानुजन यांच्या Mock Theta Function ची मदत कॅन्सर उपचारात कशी होते हे सांगितले.

प्रा. वैशाली वाघ यांनी सूत्रसंचलन केले. गणित विभागप्रमुख प्रा. निलेश गावडे यांनी आभार व्यक्त केले.

# कोल्हापुरच्या कॅफेतील ख्रिसमस पार्टीवर पोलिसांचा छापा, १०० तरुण-तरुणी ताब्यात

**कोल्हापूर :** क्रिसमस आणि नवीन वर्षानिमित्त कोल्हापुरातील उजळाईवाडी येथे पुणे - बंगळूरु राष्ट्रीय महामार्गानजीक असलेल्या एका कॅफेमध्ये बेकायदेशीरपणे सुरू असलेल्या पाटीवर स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पोलिसांनी छापा टाकत शंभरहून अधिक तरुण-तरुणींना ताब्यात घेतलं आहे. ही कारवाई रविवारी रात्रीच्या सुमारास करण्यात आली असून या कारवाईत मद्यसाठ्यासह एकूण २ लाख ८२ हजारांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कोल्हापुरातील उजळाईवाडी परिसरातील माया नावाच्या कॅफेमध्ये क्रिसमस आणि



नवीन वर्षाच्या स्वागतासाठी बेकायदेशीरपणे पाटीचे आयोजन करण्यात आले होते. या पाटीमध्ये शंभरहून अधिक पुरुष आणि महिला सहभागी झाल्या होत्या. कॅफेमध्ये सुरू असलेल्या कर्णकर्कश आवाजात मद्यपान करत तरुणाई थिरकत होती. तर यामुळे आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांना त्रास होत होता.

दरम्यान, या घटनेची माहिती पोलीस अधीक्षक महेंद्र पंडित यांना समजली आणि त्यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक रवींद्र कळमकर यांच्या नेतृत्वाखाली पथक तयार करून या पाटीवर छापा टाकला. या पाटीमध्ये ६० पुरुष आणि ४०हून अधिक महिलांचा सहभाग असल्याचे पोलिसांना दिसून आलेलं आहे. या प्रकरणी कॅफे 'माया'चा मालक दयानंद जयंत साळुंखे, पाटी आयोजक मयुरा राजकुमार चुटानी, डीजे ऑपरेटर गणेश लहू खरात, मालक दिगंबर रघुनाथ सुतार यांच्यासह कामगारांवर पोलिसांनी कारवाई करत गोकुळ शिरगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

कॅफेमधून ५३ हजार ७२५ रुपये किमतीचा विदेशी मध्य, ८८ हजार ७४० रुपये रोख रक्कम व एक लाख ४० हजार रुपये किमतीचा डीजे सिस्टीम असे एकूण ३ लाख ८२ हजार ४६५ रुपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक महेंद्र पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक रविंद्र कळमकर, सहा. पोलीस निरीक्षक सागर वाघ, सहा. फौजदार हरीश पाटील, खंडेराव कोळी, पो. हे कॉ. विलास किरोळकर, अमित सरजे, सचिन पाटील, संतोष पाटील, युवराज पाटील, प्रवीण पाटील, अमर अडूर्कर, सतीश पोवार, रणजित कांबळे, समीर कांबळे, सोम राज पाटील यांनी केली आहे.

# नाशिक फाटा ते चांडोली, तळेगाव ते चाकण शिक्रापूर व वाघोली ते शिक्रापूर या तीन रस्त्यांची टेंडर प्रक्रिया सुरू

## एलिव्हेटेड कॉरिडोर रस्त्यासाठी तीस हजार कोटी रुपये होणार खर्च

**नारायणगाव :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार व शिरूर लोकसभा मतदार संघाचे खासदार डॉक्टर अमोल कोल्हे यांच्यामध्ये शाब्दिक लढाई नुकतीच झाली आहे. हे घडत असताना सध्या अनेक राजकीय भूकंप देखील बसत आहेत.

खासदार डॉक्टर अमोल कोल्हे यांनी आज केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे पुन्हा एकदा आभार मानले आहेत.

शिरूर लोकसभा मतदारसंघात एकूण ३० हजार कोटी रुपये मंजूर असलेल्या तीन एलिवेटेड कॉरिडोरच्या कामाची निविदा प्रक्रिया सुरू झाली आहे. या कामामुळे सातत्याने पाठपुरावा करत असलेल्या या मोठ्या प्रकल्पाच्या कामाला लवकरच सुरुवात होणार आहे.

नाशिक फाटा ते चांडोली, तळेगाव ते चाकण शिक्रापूर व वाघोली ते शिक्रापूर या तीन रस्त्यांची टेंडर प्रक्रिया केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे आपण सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे सुरू झाली असल्याची माहिती खासदार कोल्हे यांनी दिली. यामुळे पुणे नाशिक महामार्ग शिरूर नगर महामार्ग व चाकण ते शिक्रापूर दरम्यान नेहमी होणारी येथील वाहतुकीची समस्या कायमची कमी होणार असून याबाबत खासदार डॉक्टर अमोल कोल्हे यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे आभार मानले आहेत.

# सांगली : औदुंबरसह जिल्ह्यात दत्तजयंती उत्साहात साजरी

सांगली : कृष्णाकाठी असलेल्या औदुंबरसह जिल्ह्यात मंगळवारी दत्तजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. औदुंबर येथे गुरू दत्त महाराजांचे दर्शन घेण्यासाठी पहाटेपासूनच भाविकांनी गदी केली होती. तर सांगलीतील हिराबाग पॉवर हाउस, जिल्हा परिषद, खणभाग, पेठभागमधील दत्त मंदिरामध्ये तर मिरजेतील मैदान दत्त मंदिर येथे असलेल्या एकमुखी दत्त मंदिरामध्ये दर्शनासाठी भाविकांच्या रांगा लागल्या होत्या.

दिगंबरा दिगबंरा श्रीपाद वल्लभ दिगबंराह्णच्या गजरामध्ये श्री क्षेत्र औदुबंर येथे सायंकाळी ५.३० वाजता



दत्त जन्मकाळ संपन्न झाला. यावेळी मंदीर परीसरामध्ये भाविकांची अलोट गदी उसळली. आज दत्त जयंती निमित्ताने महाराष्ट्रभरातून अनेक भाविक श्री क्षेत्र औदुबंर येथे दाखल झाले होते. पहाटे ५ वाजल्यापासुन दत्त मंदीरामध्ये गदी झाली होती. श्री दत्त जन्मकाळाच्या वेळी मंदीर परीसर फुलांनी बहरून गेला.

आज दिवसभरामध्ये भाविकांची संख्या मोठी होती. भाविकांनी श्री दत्तगुरूंच्या विमल पादुकांचे दर्शन घेतले. रात्री ११ वाजेपर्यंत भाविकांची गदी होती. औदुंबरमध्ये येणारे चारही रस्ते गदीनी वाहून गेले होते. औदुबंर फाटा या ठिकाणी व औदुबंरला येणारे दोन्ही रस्ते वाहतुकीसाठी बंद केल्याने औदुंबरमध्ये वाहानांची गदी झाली नाही. श्री दत्त सेवाभावी मंडळाच्यावतीने जेष्ठ नागरिकांना ने-आण करण्यासाठी मोफत रिक्षाची सोय केली होती.

पहाटे काकड आरती, मंगल आरती दुपारी महापुजा, नैवद्य, महाआरती झाली. यानंतर महाप्रसादाचे आयोजन केले होते. श्री दत्त जन्माचे किर्तन असे धार्मिक कार्यक्रम मंदीरामध्ये संपन्न झाले. सायंकाळी साडेपाच वाजता श्री दत्त जन्मकाळ व आरती झाली. दत्त जयंती निमित्त मंदिरामध्ये व मुख्य गाभार्यास आकर्षक फुलांची आरास करण्यात आली होती. अंकलखोप ग्रामपंचाययतीच्या वतीने पाणी व वीज पुरवठ्याची व्यवस्था करण्यात आली होती. सरपंच राजेश्वरी सावंत, देवस्थान समितीचे अध्यक्ष दीपक सुयर्वंशी, अमर पाटील, धनंजय सुयर्वंशी आदींनी यात्रेकरूंची गैरसोय होणार नाही याची दक्षता घेतली होती. यात्रेनिमित्त सहायक निरीक्षक नितीन सावंत यांच्यासह सुमारे १०० पोलीसांचा फौजफाटा बंदोबस्तासाठी तैनात होता.

# नारायणगाव येथे शेतकरी आक्रोश आंदोलनात ग्रामस्थ शेतकरी सहभागी

## नारायणगाव उपबाजार केंद्रामध्ये खासदार डॉक्टर कोल्हे यांनी केले भोजन







नारायणगाव येथे शेतकरी आक्रोश आंदोलनात ग्रामस्थ शेतकरी यांना जेवण वाढताना तसेच सवर्सामान्य शेतकऱ्यांबरोबर जेवताना खासदार डॉक्टर अमोल कोल्हे (छायाचित्र - किरण वाजगे)

**नारायणगाव :-** (सा.वा.) छत्रपती शिवरायांच्या शिवजन्मभूमी किल्ले शिवनेरी गडावरून आज सकाळी शेतक□यांच्या विविध प्रश्नाबाबत शेतकरी जन आक्रोश मोर्चाला खासदार डॉक्टर अमोल कोल्हे यांच्या नेतृत्वाखाली सुरुवात झाली हा मोर्चा जुन्नर, ओतूर, आळेफाटा मार्गे नारायणगाव येथे आला. यावेळी नारायणगाव येथील छत्रपती संभाजी महाराज प्रवेशद्वारापासून हा मोर्चा पूर्ववेस छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रवेशद्वारा जवळ आला. तेथे छत्रपतींना मानवंदना देऊन बस स्थानकाजवळ कोपरा सभा झाली. यावेळी शिवसेना ठाकरे गट जिल्हाप्रमुख सुरेश भोर, माजी उपजिल्हा प्रमुख शरद चौधरी, युवा नेते सुजित खैरे, संतोष वाजगे, रमेश भुजबळ, राजश्री बोरकर, सुजाता डोंगरे, वारूळवाडी च्या उपसरपंच ज्योती संते, यल्लू लोखंडे, दिलीप वाजगे, रामदास बाळसराफ, रमेश मेहेत्रे, दिलीप कोल्हे, आदी मान्यवर उपस्थित होते. कोपरा सभेमध्ये उपसरपंच योगेश पाटे, शिवसेनेचे तालुकाप्रमुख माऊली खंडागळे, विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष सत्यशील शेरकर यांनी मनोगत व्यक्त केले, यानंतर मोर्चामध्ये सहभागी शेतकरी बांधव, पदाधिकारी तसेच पोलीस कमर्चा□यांसाठी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नारायणगाव उपबाजार केंद्रात जेवणाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी खासदार डॉक्टर अमोल कोल्हे यांनी स्वतः आंदोलनकर्त्यांना, शेतकरी व पोलिसांना जेवण वाढले व स्वतःही त्यांच्यासोबत जेवण केले.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत तरसाचा मृत्यू

## नारायणगाव परिसरात वर्षभरात बिबट्या, तरस अशा सहा वन्य प्राण्यांचा अपघातात मृत्यू



**नारायणगाव :-** (सा.वा.) नारायणगाव येथे अज्ञात वाहनाच्या धडकेमध्ये एक तरस प्राणी ठार झाला. पुणे नाशिक महामार्गावर मुक्ताई ढाब्या जवळ आज दि. २८ रोजी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास आळेफाटा बाजूकडे जाणाऱ्या रस्त्यावर ही घटना घडली. ठार झालेला तरस प्राणी हा मादी असून अंदाजे पाच वर्षे वयाचा पूर्ण वाढ झालेला आहे. दरम्यान नारायणगाव परिसरात गेल्या वर्षभरात सुमारे पाच ते सहा बिबट, तरस, कोल्हा अशा वन्य प्राण्यांचा अज्ञात वाहनाच्या धडकेत मृत्यू झाल्याच्या घटना घडल्या आहेत. यावरूनच येथे असलेल्या वन्य प्राण्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याचे निदशर्नास येत आहे

अपघातात ठार झालेल्या तरसाची माहिती कळताच वनपाल अनिता होले, वनरक्षक ज्ञानेश्वर पवार, वारुळवाडी चे पोलीस पाटील सुशांत भुजबळ यांनी तरस प्राण्याला येडगाव येथील वन विभागाच्या जिप्सन बंगला येथे नेले. तेथे पशुवैद्यकीय अधिकारी डॉक्टर राणे यांनी त्याचे शव विच्छेदन केले. वनविभागाच्या वतीने त्याचे तेथेच दहन करण्यात आले.